सोमवार, १० ऑक्टोबर २०२२

# राम प्रहर


वर्ष १५ • अंक ८३
www.ramprahar.com

पाने ८ • किंमत ₹२ • रायगड

## अंतरंग

इंदापूर-धामणदेवी चौपदरीकरण लवकरच/२
उरणमध्ये होणार खारफुटींचे जतन/३
पाताळगंगा नदीचे प्रदूषण चिंतेची बाब/७

## गुजरातमधील मोढेरा सौरऊर्जेचे गाव म्हणून घोषित



**अहमदाबाद :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रविवारी (दि. ९) गुजरातमधील मोढेरा, मेहसाणा या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात आली. यादरम्यान त्यांनी मोढेरा गावाला भारतातील पहिले २४ तास, सात दिवसांचे सौरऊर्जेचे गाव म्हणूनही घोषित करण्यात आले. या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बोलताना सांगितले की, आज मोढेरासाठी मेहसाणा आणि उत्तर गुजरातसाठी ही विकासाची एक नवी ऊर्जा प्राप्त झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या विकासात्मक प्रकल्पामुळे आमच्या सरकारच्या विश्वासाचा आणि तंत्रज्ञानाचा एकत्र संगम झाल्याचे येथे पाहायला मिळत आहे. मोढेरातील आता अनेक गोष्टी या आधुनिकतेसाठी नवा आदर्श असतील, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

# मोदींचे नाणे चालतच राहणार

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर

**मुंबई : प्रतिनिधी**

'धनुष्यबाण' हे शिवसेनेचे निवडणूक चिन्ह निवडणूक आयोगाने गोठवल्यानंतर त्यावरून राज्यात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार आरोप-प्रत्यारोप होऊ लागले आहेत. या पार्श्वभूमीवर मातोश्रीवर उद्धव ठाकरेंनी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करताना 'नरेंद्र मोदी घासले गेलेले नाणे आहेत' असा उल्लेख केल्याची चर्चा आहे. यावरून भाजपकडून आक्षेप नोंदवण्यात येत आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, मोदींचे नाणे हे यापुढेही चालतच राहणार आहे, अशा शब्दांमध्ये उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर दिले आहे.

शिवसेनेचे धनुष्यबाण हे चिन्ह निवडणूक आयोगाने गोठविले आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे नैराश्यातून भाजप व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर आरोप करीत आहेत. देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, बहुतेक उद्धव ठाकरे हे विसरलेत की, नोटबंदीनंतरच्या सगळ्या निवडणुका ते मोदींच्या नाण्यावरच जिंकले आहेत. त्यांचे १८ खासदार आणि ५६ आमदार मोदीजींचे नाणे दाखवूनच निवडून आले. त्यामुळे बाळासाहेब ठाकरे हे नेहमीच श्रद्धेय राहतील, पण देशात मोदींचे नाणे चालतच राहिल, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.



निवडणूक आयोगाने धनुष्यबाण हे चिन्ह गोठवण्याचे अंतरिम आदेश दिले, यात आपल्याला आश्चर्य वाटले नसल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत. गेल्या २५ वर्षांमध्ये कोणत्याही राज्यात एखाद्या पक्षात फूट पडली आणि निवडणूक आयोगासमोर ते प्रकरण गेले तेव्हा निवडणूक आयोगाने अंतरिम आदेश देत चिन्ह आणि पक्षाचे नाव गोठवले आहे. त्यानंतर त्यावर सुनावणी घेऊन कायद्यानुसार ज्याचा हक्क असतो, त्याला ते मिळते. निवडणूक आल्यामुळे ते करणे गरजेचे होते. मला अपेक्षा आहे की, जेव्हा निवडणूक आयोग अंतिम निर्णय देईल, तेव्हा एकनाथ शिंदेंची बाजू वरचढ ठरेल, असे ते म्हणाले.

### उद्धव ठाकरेंकडून तीन चिन्हे सादर

**मुंबई :** उद्धव ठाकरे यांनी रविवारी (दि. ९) फेसबुक लाइव्हवरून जनतेशी संवाद साधला. पक्षाचे चिन्ह गोठविल्यामुळे उद्धव ठाकरे गटाकडून तीन नावे आणि तीन चिन्हांची यादी पाठवण्यात आली आहे. त्यामध्ये त्रिशूळ, उगवता सूर्य आणि मशाल ही चिन्हे तर शिवसेना बाळासाहेब ठाकरे, शिवसेना बाळासाहेब प्रबोधनकार ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे ही नावे पाठवण्यात आली आहेत. निवडणूक आयोगाच्या परवानगीनंतर नाव ठरवण्यात येणार असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

# उरणच्या वायूविद्युत निर्मिती केंद्रात स्फोट; एकाचा मृत्यू

## तीन कामगार गंभीररित्या जखमी

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार, वार्ताहर**



बोकडविरा येथील वायूविद्युत निर्मिती केंद्रात बॉयलरच्या पंपाचा भीषण स्फोट झाल्याने झालेल्या या दुर्घटनेत एका ज्युनियर इंजिनियरसह दोन कामगार गंभीररित्या जखमी झाले आहेत. प्राथमिक उपचरानंतर त्यांना अधिक उपचारासाठी नवी मुंबईत नेण्यात आले, मात्र उपचारादरम्यान एका कामगाराचा मृत्यू झाला आहे. ही घटना रविवारी (दि. ९) दुपारच्या सुमारास घडली.

सुटीच्या दिवशीही वायूविद्युत निर्मिती संच सुरू असल्याने काही मोजके कामगार हजर होते. दुपारी १२ ते १२:३० वाजण्याच्या सुमारास काम सुरू असतांना बॉयलरमधील दाब अचानकपणे वाढला. त्यामुळे बॉयलरला जोडलेला बीसीसी पंप दाब सहन न करू शकल्याने या पंपाचा जबरदस्त स्फोट झाला.

या ठिकाणी काम करीत असलेले ज्युनियर इंजिनियर विवेक धुमाळे, टेक्निशियन कुंदन पाटील रा. डोंगरी, विष्णू पाटील रा. बोकडविरा हे या झालेल्या स्फोटात गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी उरणमधील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले असता प्राथमिक उपचारानंतर दोघांना नवी मुंबईतील ऐरोली येथील रुग्णालयात तर एकाला नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान विवेक धुमाळे यांचा मृत्यू झाला आहे. स्फोटाबाबत पोलीस अधिक तपास करीत आहे.

# वाडवडिलांनी कमावले ते मुलाने गमावले

## 'मविआ'चे नेते एकनाथ खडसेंचा उद्धव ठाकरेंना घरचा आहेर

**कल्याण : प्रतिनिधी**

शिवसेनेचे निवडणूक चिन्ह असेलले 'धनुष्यबाण' निवडणूक आयोगाने गोठवल्यानंतर आता महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते एकनाथ खडसे यांनीही उद्धव ठाकरेंना सुनावले आहे. वाडवडिलांनी जे आयुष्यभर कमावले ते मुलाने गमावले असे म्हणत त्यांनी उद्धव ठाकरेंना घरचा आहेर दिला आहे. कल्याणमध्ये एका कार्यक्रमानिमित्त आले असता ते बोलत होते.

राज्यातले वातावरण अस्थिर आहे. असे राजकारण गेल्या ३०-४० वर्षांत राज्यात कधीही पाहिले नाही. एकमेकांच्या विरोधात व्यक्तिगत पातळीवर आरोप करणे हे कधीही झाले नाही. विरोधासाठी विरोध व्हायचा, पण नंतर सगळे एकत्र यायचे. आता शत्रुत्व असल्यासारखे सगळे चालू आहे. आयुष्यभर सरसेनापती बाळासाहेब ठाकरेंनी मेहनत केली. धनुष्यबाणाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. या धनुष्यबाणाच्या जोरावर महाराष्ट्रात सत्ता काबीज केली. राज्यात शिवसेनेचे मुख्यमंत्री झाले, पण ही वर्षानुवर्षांची पुण्याई मुलाने गमावली. यापेक्षा दुर्दैवी प्रसंग नसावा, अशा शब्दांत एकनाथ खडसेंनी प्रतिक्रिया दिली. वाडवडिलांनी आयुष्यभर जे कमावले, ते एका मिनिटात मुलाने घालवले, असेही ते म्हणाले.



**खारघर : येथे अरेना ॲनिमेशन संस्थेचे उद्घाटन भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी झाले. या वेळी ॲप्टेकचे सीएमओ प्रविर अरोरा, भाजपचे खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, उपाध्यक्ष दिलीप जाधव, महिला मोर्चा सरचिटणीस साधना पवार, सोशल मीडिया संयोजक अजय माळी, सहसंयोजक मोना अडवाणी, उत्तर रायगड उपाध्यक्ष गीता चौधरी, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, गुरुनाथ गायकर, भाजप उत्तर भारतीय सेलचे सहसंयोजक सुमित सहाय, ज्येष्ठ नागरिक सेलचे संयोजक नवनीत मारू, शिक्षक सेलचे संयोजक संदीप रेड्डी, रतन भोईर आदी उपस्थित होते.**

## निवडक

### देवी दर्शनासाठी गेलेल्या दोघांचा बुडून मृत्यू

**डोंबिवली :** भोपर येथे देवीच्या दर्शनासाठी गेलेल्या दोघांचा खदाणीच्या पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. तरुणांचे मृतदेह अग्निशामक दलाच्या जवानांनी आणि ग्रामस्थांनी मिळून बाहेर काढण्यात आले. डोंबिवली आयरे गावातील सहा तरुण रविवारी (दि. ९) भोपर येथील गावदेवी मंदिरात देवीच्या दर्शनासाठी आले होते. त्यावेळी मागच्या खदाणीत पोहण्यासाठी गेले असता खदाणीतील पाण्याचा अंदाज न आल्याने त्यातील दोघांचा मृत्यू झाला.

### दिल्ली सरकारमधील मंत्री राजेंद्र पाल गौतम यांचा राजीनामा

**नवी दिल्ली :** दिल्ली सरकारमधील समाजकल्याण मंत्री राजेंद्र पाल गौतम यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. राजेंद्र पाल गौतम यांनी हिंदू देवतांचा अपमान केल्याप्रकरणी भाजपने त्यांच्या विरोधात आंदोलन केले होते. गौतम हे एका कथित धर्मांतर कार्यक्रमात सहभागी झाल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर भाजपने गौतम यांच्यावर हल्लाबोल केला होता. त्यानंतर राजेंद्र पाल गौतम यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.

# आमदार महेश बालदी यांच्या निधीतून रस्ते काँक्रीटीकरण

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल आणि उरण तालुक्यात भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि उरणचे आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली विकासपर्व सुरू आहे. त्या अंतर्गत गव्हाण ग्रामपंचायत हद्दीतील अंतर्गत रस्त्याचे आणि न्हावे ग्रामपंचायत हद्दीतील बोरण रस्त्याचे काँक्रीटीकरण महेश बालदी यांच्या आमदार निधीतून करण्यात येणार आहे. या विकासकामांचे भूमिपूजन रविवारी (दि. ९) भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.



गव्हाण ग्रामपंचायत हद्दीतील वैभव देशमुख यांच्या घरापासून ते स्मशानभूमीपर्यंतच्या ४०० मीटर रस्त्याचे आणि न्हावा येथे १९० मीटरच्या बोरण रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. या कामाचा रविवारी शुभारंभ झाला.

या भूमिपूजन समारंभांना न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, भाजप तालुका चिटणीस जयवंत देशमुख, चंद्रकांत भोईर, विश्वनाथ कोळी, हेमंत ठाकूर, गव्हाण ग्रामपंचायत सदस्य उषा देशमुख, योगिता भगत, कामिनी कोळी, तुषार भोईर, **(पान २ वर...)**

# देशातील चित्ता पर्यटन लवकरच

## देखरेखीसाठी नऊ सदस्यांचा टास्क फोर्स

**नागपूर : प्रतिनिधी**

दक्षिण आफ्रिकेतून मध्यप्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात चित्त्यांचे स्थलांतरण करण्यात आल्यानंतर त्यासंबंधी एकूण घडामोडींवर लक्ष ठेवण्यासाठी नऊ सदस्यांच्या चित्ता टास्क फोर्सची स्थापना केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने केली आहे. या टास्क फोर्सच्या सूचनेनंतरच देशातील चित्ता पर्यटन शक्य होणार आहे.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण चित्ता टास्क फोर्सला पूर्णपणे सहकार्य करणार असून त्यांचे काम सुलभ करेल, असे केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने म्हटले आहे. चित्ता टास्क फोर्स दोन वर्षांसाठी गठीत करण्यात आले असून या प्रकल्पाला नियमितपणे भेट देण्यासाठी ते उपसमिती नियुक्त करु शकतात. चित्ता टास्क फोर्समध्ये मध्यप्रदेशातील वने आणि वन्यजीव विभागातील पाच वरिष्ठ अधिकारी, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाचे महानिरीक्षक अमित मलिक आणि भारतीय वन्यजीव संस्थेचे शास्त्रज्ञ विष्णू प्रिया यांचा समावेश आहे.

चित्ता टास्क फोर्स कुनो राष्ट्रीय उद्यानातील चित्त्यांच्या आरोग्य स्थितीचा आढावा घेईल आणि त्यांचे शिकार करण्याचे कौशल्य तसेच तेथील अधिवासाशी ते जुळवून घेत आहेत का, याचेही निरीक्षण करेल, तसेच ते चित्त्यांच्या विलगीकरणाच्या स्थानापासून तर हळूवारपणे सोडण्यात येणाऱ्या बंदिस्त कुंपणापर्यंत आणि नंतर गवताळ जमीन ते खुल्या वनक्षेत्रापर्यंतचे निरीक्षण करणार आहे.

कुनो राष्ट्रीय उद्यानात लोक चित्ते कधी पाहू शकतात हे टास्क फोर्स ठरवेल, असे सप्टेंबर महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'मध्ये सांगितले होते. त्यानंतर केंद्राने टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली आहे.

# फणसाड अभयारण्यात शेकरूंची संख्या वाढली

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात असणाऱ्या सुप्रसिद्ध फणसाड अभयारण्यात शेकरू या दुर्मीळ प्रजातीच्या प्राण्यांची संख्या वृद्धींगत होत आहे. भीमाशंकर अभयारण्यापाठोपाठ आता फणसाड अभयारण्यसुद्धा शेकरूंसाठी प्रसिद्ध होत आहे. शेकरू म्हणजेच खारुताईपेक्षा मोठ्या आकाराने असणारा प्राणी.

फणसाड अभयारण्य हे पाच हजार ३०० हेक्टर परिक्षेत्रात पसरले असून रोहा व मुरूड तालुक्यात याची व्याप्ती आहे. घनदाट अशा या अभयारण्यात उंच अशी निलगिरी वृक्षांची मोठमोठी झाडे आहेत. अभयारण्यातील उंच झाडांवर शेकरू या प्राण्यांची घरटी आढळून येत आहेत. पोषक वातावरण, मोठ्या प्रमाणात पाऊस यामुळे शेकरूंना आवश्यक लागणारे खाद्य या अभयारण्यात असल्याने शेकरूंची संख्या वाढत असल्याचे दिसून येत आहे.



एक शेकरू स्वतःला राहण्यासाठी किमान पाच ते सहा घरटी बनवत असतो. हा प्राणी फार भित्रा तसेच लाजाळू प्राणी आहे. चिखलगान भागात भरपूर शेकरूंची संख्या असून येथे पर्यटक नेहमी गर्दी करून दुर्बिणीच्या साह्याने न्याहाळतात. शेकरूंचे आवडते खाद्य हे गारंबीचा शेंगातील आतला गर असून फळे, कोवळा पाला, जांभूळ फळे हे आहेत. फणसाड अभयारण्यात शेकरूंची जतन व संवर्धनासाठी विशेष काळजी घेतली जात असल्याची माहिती फणसाड प्रशासनाकडून देण्यात येत आहे. **(पान २ वर...)**

### शिकारीचे प्रमाण शून्यावर

शिकारीचे प्रमाण या भागात शून्य टक्क्यावर आहे. रात्रीची गस्त व जागता पहारा असल्याने शिकारीला जाणे टाळले जाते. काही दिवसांपूर्वीच शिकारीच्या बेताने आलेल्या लोकांना पकडण्यात आले. त्यामुळे येथे फणसाड अभयारण्य प्रशासनची दहशत निर्माण झाली आहे.

# 'रोटरी'च्या दिवाळी ड्रायफ्रुट प्रोजेक्टला सुरुवात

## परेश ठाकूर व डॉ. गिरीश गुणे यांच्या हस्ते शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळी सणाचे सर्वांना वेध लागले असून सण मोजक्याच दिवसांवर आला आहे. त्या पार्श्वभूमीवर गेल्या दहा वर्षांपासून रोटरी क्लब ऑफ सेंट्रलच्या वतीने राबवला जाणारा 'दिवाळी ड्रायफ्रुट प्रोजेक्ट' सुरू झाला आहे. या उपक्रमाचे उद्घाटन महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. ९) झाले. या वेळी त्यांनी हा उपक्रम समुदाय विकासासाठी महत्त्वाचा असून हा असाच सुरू राहिला पाहिजे, असे प्रतिपादन केले.



रोटरी क्लब ऑफ सेंट्रलच्या वतीने दिवाळी ड्रायफ्रुट प्रोजेक्ट हा गेल्या दहा वर्षांपासून राबवला जात आहे. कोरोना महामारीमुळे दोन वर्षे हा उपक्रम राबविण्यात आला नव्हता, मात्र यंदाच्या वर्षापासून दिवाळी ड्रायफ्रुट प्रोजेक्ट हा उपक्रम पुन्हा सुरू करण्यात आला आहे. शहरातील दांडेकर हॉस्पिटलमध्ये हा उपक्रमाचा शुभारंभ माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते आणि क्लबचे मार्गदर्शन डॉ. गिरीश गुणे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

दिवाळी ड्रायफ्रुट प्रोजेक्टच्या माध्यमातून आपल्या नातेवाईकांना, तसेच ऑफिसमधील कर्मचाऱ्यांना दिवाळीला भेट म्हणून देण्यासाठी ड्रायफ्रूट हे अगदी माफक दरात उपलब्ध करून देण्यात येतात. **(पान २ वर...)**

# इंदापूर-धामणदेवी चौपदरीकरण लवकरच

## सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांची माहिती



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला आता अधिक गती मिळणार असून या महामार्गावरील रायगड जिल्ह्यातील इंदापूर ते धामणदेवी या सुमारे ६.५ किमी. च्या रखडलेले चौपदरीकरणाचे काम आता लवकरच सुरू होणार आहे. सुमारे दोन वर्षे रखडलेले हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री रविंद्र चव्हाण यांनी अवघ्या १५ दिवसांत मार्गी लावल्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावरून प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाश्यांना आता खऱ्या अर्थाने दिलासा मिळणार आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या इंदापूर ते धामणदेवीच्या चौपदरीकरणाच्या मार्गाची जमीन ही वनजमिन असल्यामुळे वनविभागाची परवानगी आवश्यक होती, त्यामुळे हे काम गेले दोन वर्षांपासून रखडले होते. या चौपदरीकरणाचे काम करण्यासाठी वनविभागाकडे वनजमीन मंजुरीचा प्रस्ताव स्टेज १च्या परवानगीसाठी प्रलंबित होता, परंतु त्या प्रस्तावानुसार स्टेज १साठी मुख्य मान्यता वनविभाग नागपूर यांनी २२ एप्रिल २०२१ रोजी दिली होती. तथापि सदर परवानगी देताना वनखात्यामार्फत रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावण्यासाठी रु. १५.९१ कोटी भरण्याची अट वनविभाग नागपूरकडून घालण्यात आली होती, परंतु रकमेची तरतूद ही या प्रकल्प निधीमध्ये नसल्यामुळे ही रक्कम वनविभागाकडे जमा करण्यासाठी काही अडचणी येत होत्या.

गेल्या १५ दिवसांपूर्वी मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या निर्दशनास हे प्रकरण आले असता त्यांनी तातडीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांची या संदर्भात बैठक घेतली. या बैठकीतच मंत्री चव्हाण यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व परिवहन मंत्रालय यांच्याशी चर्चा करून झाडे लावण्यासाठीचे आवश्यक १५.९१ कोटी रुपये लवकर भरण्याची परिवहन मंत्रालयाकडे केली. त्यानुसार केंद्रीय रस्ते वाहतूक व परिवहन मंत्रालय यांच्याकडून आवश्यक १५.९१ कोटी रुपये मंजूर करण्यात आल्याची माहिती मंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिली.

केंद्रीय रस्ते वाहतूक व परिवहन मंत्रालयाकडून आवश्यक आर्थिक मंजुरी मिळाल्यानंतर मुंबई-गोवा या महामार्गावरील या प्रलंबित राहिलेल्या टप्प्याच्या कामासाठी लवकर परवानगी देण्याची विनंती आता वन विभागाकडे करण्यात आली आहे. मुंबई-गोवा महामार्गावरुन प्रवास करणाऱ्या लाखो नागरिकांच्या दृष्टीने हे काम लवकर पूर्ण होणे अपेक्षित आहे. जेणेकरून नागरिकांना त्यांच्या प्रवासामध्ये दिलासा मिळू शकेल अशी अपेक्षा मंत्री रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केली. त्यानुसार वनविभागानेही सकारात्मक पावले उचलचून या जागेसाठी तत्वत: मंजुरी दिली आहे, तसेच या चौपदीकरणासाठी प्रत्यक्ष काम करण्याची परवानगी अंतिम टप्प्यात आहे, ही परवानगी काही दिवसांत मिळाल्यानंतर तातडीने इंदापूर ते धामणदेवी या सुमारे ६.५ किमीच्या चौपदीकरणाचे काम सुरू होणार असून मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाला अधिक गती मिळेल व काम लवकर पूर्ण करणे शक्य होईल, असेही मंत्री रवींद्र चव्हाण यांनी सांगितले.

# अद्ययावत आरोग्य व्यवस्था निर्मितीस प्राधान्य द्यावे-तुकाराम मुंढे

**पुणे : प्रतिनिधी**

बदलत्या परिस्थितीस सक्षमपणे सामोरी जाणारी अद्ययावत आरोग्य व्यवस्था निर्मितीस प्राधान्य दिले जावे, असे आरोग्य सेवा आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सांगितले. मुंढे यांनी आरोग्य सेवेतील पुणे येथील विभाग प्रमुखांची आढावा बैठक घेतली, त्यावेळी त्यांनी या सूचना दिल्या.

आरोग्यसेवा विषयीची माहिती अद्ययावत ठेवून त्यांचे नियोजन व संस्थांच्या सेवांच्या विकासासाठी वापर करावा, आरोग्यासंबंधी ऋतूनुसार आरोग्य सेवांची तयारी ठेवावी. साथीच्या आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक जिल्हा व प्रत्येक तालुक्यातील परिस्थितीवर सनियंत्रण ठेवावे, रोजच्या आकडेवारीवर लक्ष ठेवून जिल्हा व प्रत्येक



तालुक्यातील आरोग्य सेवेतील अधिकारी कर्मचारी यांच्याशी समन्वय व नियंत्रण ठेवून पाठपुरावा करावा.

जिल्हा व गाव पातळीवरील संस्थांशी चांगला संवाद ठेवून रोजचा आढावा घेतला जावा, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकारी वर्गाला केल्या. सर्व भागधारकांशी प्रभावी समन्वयाने आरोग्य विभाग काम करेल, असेही त्यांनी या वेळी बैठकीत सांगितले.

जागतिक आरोग्य संघटनेच्या आणि आयपीएचएस स्टँडर्डनुसार आरोग्य प्रणालीसाठी वापरात येणाऱ्या सहा घटकांवर आधारित, जसे देण्यात येणाऱ्या सेवा, आरोग्य सेवेतील घटक, आरोग्य माहिती प्रणाली, आवश्यक असणाऱ्या औषधांची उपलब्धता, आरोग्य प्रणाली वित्त पुरवठा, नेतृत्व व शासन या सहा घटकावर भर देण्याविषयी त्यांनी अधिकाऱ्यांना सूचित केले.

आरोग्य सेवा अधिक सक्षम व लोकाभिमुख होण्यासाठी आपला प्राधान्यक्रम असेल असेही त्यांनी या वेळी स्पष्ट केले. या बैठकीत पुणे येथील आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर व पुणे येथील सर्व विभाग प्रमुख, सहाय्यक संचालक व विकासात्मक स्वयंसेवी संस्थेचे सल्लागार उपस्थित होते.

# कर्जतमध्ये ईदनिमित्त रक्तदान शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील मुस्लिम समाजाचे वतीने पवित्र ईद-ए -मिलादनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात १३१ जणांनी रक्तदान केले.



सार्वजनिक रक्तदाते राजाभाऊ कोठारी यांचे हे ४६०वे रक्तदान शिबिर आयोजन होते. रक्तदान शिबिराला शुभेच्छा देण्यासाठी राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी हजेरी लावली. या वेळी कर्जत नगर परिषद उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, भाजप किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे, सराफ असोसिएशनचे अध्यक्ष मोहन ओसवाल, शिवसेना शिंदे गटाचे शहर प्रमुख अभिषेक सुर्वे, यांच्यासह रक्तदान चळवळीचे कार्यकर्ते जयेश म्हसे, रंजन दातार, कृष्णा जाधव, विनोद पांडे, महेंद्र कांबळे आदी उपस्थित होते.

मुंबई घाटकोपर येथील समर्पण ब्लड बँकेच्या डॉ. शेखर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य पथकाने रक्तसंक्रमण केले.

# टेम्पोतून जनावरांची वाहतूक; दोघांविरोधात गुन्हा

**महाड : प्रतिनिधी**

दोन म्हशींची चोरी करून त्यांची टेम्पोतून नियमबाह्य वाहतूक करणाऱ्या दोघांविरोधात महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.टेम्पो व दोन म्हशींसह पाच लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही घटना शनिवारी (दि. ८)सायंकाळी शिरगाव चेकपोस्टजवळ घडली.

एक टेम्पो संशयास्पदरित्या शिरगाव चेकपोस्ट नाक्याजवळ पोलिसांनी अडवून त्याची तपासणी केली असता त्यामध्ये सुमारे ७० हजार रुपये किंमतीच्या दोन म्हशी दाटीवाटीने कोंबलेल्या आढळल्या. लम्पी आजारामुळे गुरांची वाहतूक करण्यास बंदी असतानाही जनावरांची वैद्यकीय तपासणी न करता तसेच त्यांच्या चारापाण्याची सोय न करता वाहतूक केली जात होती.

तपासणीदरम्यान या गुरांची चोरी करून त्यांची वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आल्याने पोलिसांनी राहूल बाळू चव्हाण (रा. महाड) व अजय राजू चव्हाण (रा.करंजखोल) या दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याबाबत पोलिस शिपाई गजानान शिंदे यांनी महाड शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

# ...त्यामुळे उद्धव ठाकरेंवर धनुष्यबाण गमावण्याची वेळ

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

निवडणूक आयोगाने जेव्हा धनुष्यबाण गोठवले, तेव्हा उद्धव ठाकरेंना देवेंद्र फडणवीस आणि रामदास आठवले, निवडणूक आयोगाने शिवसेना नाव गोठवले, कारण उद्धव ठाकरेंनी महायुतीच्या मागे लागून, एकनाथ शिंदेंना आमच्याकडे पाठवले!

अशी कविता सादर करून रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी महाविकास आघाडीच्या नादी लागल्यामुळे शिवसेनेचे निवडणूक चिन्ह गोठविण्याची



वेळ पाहण्याची परिस्थिती उद्धव ठाकरे यांच्यावर आली आहे, असा टोला लगावला.

शिवसेना-भाजप यांची २५ वर्षांची युती तोडून काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसशी महाविकास आघाडी करण्याचा उद्धव ठाकरे यांचा निर्णय अयोग्य होता. ती चूक दुरुस्त न केल्यामुळे एकनाथ शिंदे यांनी भाजपशी युती केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे बहुमत आहे. निवडणूक आयोगाने अंतरिम निर्णय देऊन धनुष्यबाण चिन्ह गोठवले आहे, मात्र अंतिम निर्णया वेळी बहुमत गटाकडे धनुष्यबाण निवडणूक चिन्ह दिले जाऊ शकते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे बहुमत आहे. त्यामुळे शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह जपण्याचे काम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपले बहुमत सिद्ध करून करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन



**उरण : वार्ताहर**

वीर वाजेकर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात डॉ. सजीद शेख अंजुमन इस्लाम डिग्री कॉलेज मुरूड, प्रभारी प्राचार्य व विभाग प्रमुख यांचे व्याख्यान बीएस्सी भाग तीन रसायन शास्त्र या विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले. त्यावेळी विशेष करून विद्यार्थ्यांना परीक्षेस येणाऱ्या अडचणींसंदर्भात मार्गदर्शन केले.


कार्यक्रमास उपस्थित प्राचार्य डॉ. प्रल्हाद पवार यांनी परीक्षेत यश संपादित करण्यासाठी घ्यावयाची खबरदारीचे विश्लेषण केले, तसेच विभाग प्रमुख डॉ. स्मिता तांदळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. मऱ्याप्पा सोनवले यांनी आभार मानले. प्रा. डॉ. गुरुमित्त वादवा यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रा. इनामदार मॅडम, प्रा. यशवंत गायकवाड, चेतना तुमडे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# सुधागडात ईद-ए-मिलादुन्नबी उत्साहात

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

मुस्लिम बांधवांच्या अत्यंत पवित्र समजला जाणारा ईद - ए- मिलादुन्नबी रविवारी (दि. ९) सुधागड-पाली साजरा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ईद -ए -मिलादुन्नबी सणानिमित्त पाली सुधागड येथील खालचा मुल्ला ते गांधी चौकमार्गे नुरानी जामा मास्जिद पाली या मार्गे मिरवणूक काढण्यात आली.

तत्पूर्वी मुस्लिम बांधवांनी देशाच्या प्रगतीसाठी विशेष दुवा करीत देशावरील सर्व संकटे नष्ट होऊन, विविधता, एकता व अखंडता कायम रहावी यासाठी प्रार्थना केली. मिरवणुकीच्या मार्गावर आकर्षक सजावटीसह विद्युत रोषणाई करण्यात आली होती. जुलूसमध्ये मिठाईचे वाटप करण्यात आले. अनेक मुस्लिम बांधव जुलूसमध्ये सहभागी झाले होते. नात-ए-पाकचे वाचन करण्यात आले. मशिदीत दुरुद व सलामचा नजराना पेश करीत पैगंबर हजरत मुहम्मद





सल्ललाहू अलैही वसल्लम यांचे स्मरण करण्यात आले. नुरानी जामा मस्जीद येथे पोहचल्यावर जुलूस विसर्जित झाला. येथे धर्मगुरूंनी पैगंबरांचे जीवनमान व धर्म कार्यावर प्रकाशझोत टाकत धर्माचे पैगंबर हजरत मुहम्मद सल्ललाहू अलैही वसल्लम यांच्या उपदेश व शिकवणींवर आचारण करत समाजात समानता व मानवतेचे पर्व नांदावे यासाठी समाजबांधवांनी पुढे यावे असे आवाहन केले.

# एक्सेल कंपनी दुर्घटनेतील जखमी कामगाराचा मृत्यू

**धाटाव : प्रतिनिधी**

धाटाव औद्योगिक वसाहतीमधील एक्सेल कंपनीत १० सप्टेंबर रोजी झालेल्या अपघातात रामचंद्र उमाजी ढमाल (रा. सांगडे) या जखमी कामगारावर ऐरोली येथील रुग्णालयात मागील महिनाभर उपचार सुरू होते, परंतु रविवारी (दि. ९) अपघातात गंभीर जखमी झालेल्या कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाला.

धाटाव एमआयडीसीतील एक्सल इंडस्ट्रिज लिमिटेड या कंपनीत १० सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वा. च्या सुमारास कंपनीतील कामगार कंटेनरमधील घातक रसायन ड्रममध्ये खाली करीत असताना अचानक या घातक रसायनने पेट घेतला व मोठा स्फोट होऊन रामचंद्र ढमाल हा कामगार गंभीर जखमी झाला. त्याच्यावर ऐरोली येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. अखेर मागील महिनाभर मृत्यूशी झुंज देणाऱ्या तरुण कामगार रामचंद्र धमाल यांची प्राणज्योत रविवारी माळवली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

**कंपनीच्या स्थानिक प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे एका तरुणाला आपला प्राण गमवावा लागला. पैशांनी कुटुंबातील गेलेल्या व्यक्तीची कमी कदापी भरून निघणार नाही. त्यांच्या पत्नीला कंपनीत सामावून घेऊन लहान मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी देखील कंपनीने घेतली पाहिजे. एक्सेल कंपनीचे मालक संवेदनशील आहेत ते नक्की जबाबदारी घेतील अशी आशा आहे.**

**-अमित घाग, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष, दक्षिण रायगड, भाजप**

पान १ वरून

## आमदार महेश बालदी यांच्या निधीतून रस्ते कॉँक्रीटीकरण

चंद्रकांत पाटील, दीपक भोईर, देवेंद्र भोईर, मीनाक्षी पाटील, मंजुषा ठाकूर, कल्पना घरत, विजया ठाकूर, रंजना घरत, सुशीला पाटील, मोरेश्वर पाटील, सुहास भगत, अशोक कडू, प्रमोद कोळी, कैलास कोळी, परशुराम वासकर, हिरालाल ठाकूर, स्नेहलता ठाकूर, पूर्वा वासकर, अनिता ठाकूर, रामनाथ तांडेल यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## फणसाड अभयारण्यात शेकरूंची संख्या वाढली

या अभयारण्यात बिबट्या, सांबर, हरिण, भेकर, पिसोरी, रानमांजर, खवले मांजर, लंगूर माकडे आदी प्रजातींचे वन्यजीव राहतात. त्याचप्रमाणे येथे रानगव्यांची संख्यासुद्धा वाढत आहे. विविध पक्षी व फुलपाखरूंचीसुद्धा मुबलक संख्या असल्याने पर्यटकांची सर्वांत जास्त पसंतीस फणसाड अभयारण्य असल्याचे दिसून येत आहे.

## रोटरीच्या दिवाळी ड्रायफ्रूट प्रोजेक्टला सुरुवात

रोटरी क्लब ऑफ सेंट्रल हे या उपक्रमातून मिळणाऱ्या पैशातून विविध सामाजोपयोगी उपक्रम राबवतात.

या वेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष लक्ष्मण पाटील, प्रोजेक्ट संचालक सुनील गाडगीळ, रतन खारोल, सेक्रेटरी अनिल ठकेकर आदी उपस्थित होते.

# पशुवैद्यकांनी सुधारीत शिफारशींनुसार उपचार करावेत -सचिंद्र प्रताप सिंह

**मुंबई : प्रतिनिधी**

शासनाने खासगी पशुवैद्यकांना लम्पी आजाराच्या उपचारासाठी कोणतीही बंदी घातलेली नाही. शासकीय आणि खाजगी पशुवैद्यकांनी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाने ५ ऑक्टोबर, २०२२ रोजी दिलेल्या सुधारित शिफारशीनुसार उपचार करावेत. शासकीय अधिकाऱ्यांनी पशुपालकांकडे जाऊन औषधोपचार व लसीकरण करावे. शासनाकडून मोफत औषधोपचार व लसीकरणाचे नियोजन करण्यात आले असल्याचे पशुसंवर्धन आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी सांगितले.

सिंह म्हणाले, देशात लम्पीच्या प्रार्दुभावाने मोठ्या प्रमाणावर पशुधन दगावले आहे. राज्यात पशुधन वाचविण्यासाठी शासनाने तत्काळ लसीकरण आणि उपचार केले. ९ ऑक्टोबरपर्यंत तीन हजार ९२ पशुधनाचा मृत्यू झाला आहे. ही संख्या देशातील अन्य राज्यांच्या तुलनेत कमी आहे. पशुपालकांनी भीती बाळगण्याचे कारण नसले तरी त्यांनी आवश्यक खबरदारी घ्यावी. लम्पीचा उपचार लक्षणे दिसल्यानंतर वेळेतच सुरू झाल्यास, दगावण्याची शक्यता अत्यंत कमी असून बहुतांश जनावरे उपचाराला चांगला प्रतिसाद देत आहेत. सर्व पशुपालकांनी लम्पीच्या संभाव्य लक्षणांकडे बारकाईने लक्ष ठेवावे व त्वरित नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधावा.

राज्यात ९ ऑक्टोबर अखेर ३२ जिल्ह्यांमधील दोन हजार ३६८ गावांमध्ये लम्पीचा प्रादुर्भाव दिसून आला आहे. या गावांतील ७४ हजार ३२९ बाधित पशुधनापैकी ४१ हजार ६१४ जनावरे रोगमुक्त झाली आहेत. उर्वरीत बाधित पशुधनावर उपचार सुरु आहेत. राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये आज अखेर एकूण १२८.०१ लाख लस मात्रा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यातून १२०.३९ लाख पशुधनाचे मोफत लसीकरण करण्यात आले आहे. अकोला, जळगांव, कोल्हापूर, सांगली, वाशिम आणि मुंबई उपनगर या जिल्ह्यांमधील लसीकरण पूर्ण झाले आहे. खासगी संस्था, सहकारी दूध संघ आणि वैयक्तिक पशुपालकांनी करून घेतलेले लसीकरणाच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात सुमारे ८६.०४ टक्के गोवंशीय पशुधनाचे लसीकरण झाल्याची माहिती सिंह यांनी दिली.

# हभप श्री दामाजी गणपत गोवारी विद्यालयाचा सन्मान

**पनवेल : वार्ताहर**

कोरोनाकाळात जनजीवन विस्कळित झाले होते. काही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले. या काळात विद्यार्थ्यांना अखंडित शिक्षण देण्याचे काम केल्याबद्दल पनवेलच्या एलआयसी शाखेकडून कामोठेतील हभप श्री दामाजी गणपत गोवारी विद्यालयासह गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

या शाळेने दुर्बल घटकातील, गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले आहे, तसेच कोरोनाकाळात विद्यार्थ्यांना ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने शिक्षण दिले असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष सूरदास गोवारी यांनी दिली. या कार्यक्रमाला संस्थेचे खजिनदार हरिदास गोवारी, पनवेल विभाग अधिकारी विसपुते, एलआयसी मुख्याध्यापक विजय पाटील, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# वरूणराजा कोपला; पावसाने भातशेतीचे नुकसान

**उरण : वार्ताहर**

सध्या सर्वत्र भातशेती कापणी योग्य झाली असून, काही प्रमाणात भात कापणीला सुरुवातही झाली आहे. शेतकऱ्यांनी लावलेले कर्जत जातीचे पीक तयार होण्याच्या स्थितीत आहे, मात्र पावसाच्या भीतीने कापणीचे काम थांबविण्यात आले आहे. त्यामुळे भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

या वर्षी चालू पावसाच्या हंगामात शेतात पेरणीच्या काळापासून पावसाची संततधार आणि कडक उन्हे यामुळे शेतकऱ्यांना दुबार त्रिबार पेरण्या करून, भातशेतीची लागवड करावी लागली. रोपांच्या झालेल्या नुकसानीमुळे भातशेतीचे भवितव्य राम भरोसे झाले होते, मात्र नंतर पाऊस चांगला पडला. त्यामुळे भातशेतीला पोषक असे वातावरण मिळाले, मात्र परतीच्या पावसाची नजर या तयार झालेल्या भातपिकांना लागू लागल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सद्यस्थितीत रत्ना, कोलम, गंगोत्री अशी भातपिके तयार होऊन कापणी योग्य झाली आहेत. परतीचा पाऊस सक्रिय झाल्याने कापणीच्या हंगामात बाधा आणत, भाताचे नुकसान करत आहे. या वर्षी काही प्रमाणात रोगराई वगळता उत्तम भातशेती तयार झाली आहे. त्यामुळे शेतकरीही शिवारातील पिवळी झालेली भातपिके पाहून आनंदात असल्याचे सर्वत्र पाहायला मिळत आहे. या वर्षी शिवारात सुंदर व भरघोस आलेल्या या भात पिकांचे परतीच्या पावसामुळे नुकसान होण्याची शक्यता शेतकरी व्यक्त करू लागला आहे. त्यामुळे तोंडाशी आलेला घास परतीचा पाऊस हिरावून घेतोय की, काय याची भीती शेतकऱ्यांना लागून राहिली आहे.

# उरणच्या खारफुटींचे होणार जतन

## वन विभागाकडे जबाबदारी; अधिसूचना जाहीर

**उरण : रामप्रहर वृत्त**

राज्याच्या वन विभागाने उरण तालुक्यातील हनुमान कोळीवाडा, गोवठणे, जुई, जसखार, धुतुम, भोम, चिखली भोम, पिरकोन, धसाखोशी, वशेणी, विंधणे, पागोटे, पौंडखार, भेंडखळ, नवघर व वालटी खार या १७ गावांच्या हद्दीतील दोन हजार २०० हेक्टर खारफुटीचे संवर्धन व संरक्षण करण्याची जबाबदारी वन विभागाकडे देण्याची अधिसूचना जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे या खारफुटीचे जतन होणार आहे.



खारफुटींना मुंबई उच्च न्यायालयाच्या समुद्री वनस्पतींना संरक्षित जंगलांच्या स्वरुपात वाचविण्यासाठी दिलेल्या आदेशाप्रमाणे जतनासाठी वन विभागाला सुपूर्द करण्यात येणार आहे. जतन करायच्या या खारफुटींचे उरणमधले क्षेत्र सुमारे २२०० पेक्षा जास्त हेक्टरांचे म्हणजेच अंदाजे २२० आझाद मैदानांना सामावून घेण्याएवढे आहे. रायगड जिल्ह्यातल्या उरणमधील प्रक्रियेचे स्वागत करताना नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार म्हणाले नवी मुंबई सेझच्या अंतर्गत असलेल्या १,२५० हेक्टरांपैकी बहुतांश भाग एकतर खारफुटींच्या किंवा पाणथळ क्षेत्रांच्या अंतर्गत येतो. याचीदेखील दखल घेतली जाणे आवश्यक आहे. या समुद्री वनस्पतींच्या स्थानांतरणात होणाऱ्या उशीरामुळे व्यापक विध्वंस होऊ शकतो, असे ते पुढे म्हणाले. नवी मुंबई सेझमध्ये सिडकोचा २६ टक्के वाटा असल्यामुळे, सिडकोदेखील या क्षतीला तेवढीच जबाबदार आहे, असे कुमार यांनी निदर्शनास आणून दिले.

या आधी महसूल विभागाने वन विभागाला २०१५मध्ये २५ हेक्टरांहून जास्त सुपूर्दगी केली होती आणि या वर्षी फेब्रुवारीमध्ये ४२ हेक्टर आणि जुलैमध्ये ११०० हेक्टर स्थानांतरणाची सूचना देण्यात आली होती असे वन अधिकाऱ्यांनी सांगितले. या व्यतिरिक्त जेएनपीटीने ८१४ हेक्टरांहून जास्त खारफुटींची सुपूर्दगी केली.

अधिकारी म्हणाले ३०० हेक्टर्स एवढ्या खारफुटी बहुतांशपणे सिंचन न झालेल्या शेत जमिनींवर असून त्यांची सिडकोने दखल घेणे अजून बाकी आहे. याबद्दल स्थानिक शेतकऱ्यांसोबत मतभेद आहेत. या दरम्यान वनशक्तीची समुद्री शाखा असलेल्या सागरशक्तीचे नंदकुमार पवार यांनी जेएनपीटीनेदेखील आपल्या जवळ सुमारे १०० हेक्टर खारफुटी ठेवल्या आहेत. यांनादेखील वन खात्याला सुपूर्द करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत भाजप खारघर पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या



**खारघर : रामप्रहर वृत्त**

भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत खारघरमधील भाजप विविध सेलमध्ये पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या.

यामध्ये भाजप सोशल मीडिया महिला मोर्चा खारघर मंडल संयोजिकापदी शोभा मिश्रा, बेटी बचाओ बेटी पढ़ाओ संयोजिकापदी प्रिया दळवी, महिला मोर्चा खारघर सेक्टर ५ अध्यक्षपदी जल्पा शास्त्री, सेक्टर ४ अध्यक्षपदी अल्का सुमन, सेक्टर ६ अध्यक्षपदी हर्षा चौधरी यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

या वेळी भाजप खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, मंडल उपाध्यक्ष दिलीप जाधव, महिला मोर्चा सरचिटणीस साधना पवार, सोशल मीडिया संयोजक अजय माळी, सहसंयोजक मोना अडवाणी, उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष गीता चौधरी, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, गुरुनाथ गायकर, भाजप उत्तर भारतीय सेलचे सहसंयोजक सुमित सहाय, ज्येष्ठ नागरिक सेलचे संयोजक नवनीत मारू, शिक्षक सेलचे संयोजक संदीप रेड्डी, रतन भोईर आदी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये वाल्मिकी जयंती साजरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रामायण महाकाव्याचे रचनाकार महर्षी वाल्मिकी यांची जयंती प्रभाग क्रमांक १७ येथे साजरी करण्यात आली. या वेळी भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे पनवेल तालुका उपाध्यक्ष रावसाहेब खरात यांनी महर्षि वाल्मिकी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.




यानंतर पनवेल रेल्वे स्टेशन रोडच्या बाजूला राहणाऱ्या गोरगरिबांना नाश्ता व पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या वाटप करण्यात आल्या. या वेळी भाजप झोपडपट्टी सेलचे उत्तर रायगड जिल्हा संयोजक राहुल वाहुळकर यांनी दर्शन घेतले.

या वेळी विवेक वाल्मिकी, सन्नी बेद, दीपक चुनियाना, राज मनगवानी, विष्णू मंजुळे, सुरज टाक, संदीप बहोत, विनायक बेद, सिध्दार्थ लाहोट, सन्नी पिवाल, सन्नी बिदलान, आनंद जाधव, गणेश वाल्मिकी, अशीश चुनियाना, राजू झिरे, अमर सवडे, ईश्वर झिंझोटकर, बाबू काळे, जितेंद्र कुमार, अमर सवडे, धरम झिंझोटकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## गाडी मागे घेताना दुचाकीला धडकली; एकाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल जवळील शिरढोण गावाच्या हद्दीत असलेल्या कोकण एक्स्प्रेस हॉटेलसमोरील रस्त्यावर स्कॉर्पिओ चालकाची गाडी मागे घेताना मोटरसायकलीस धडक बसली. यामध्ये दुचाकीस्वाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

मनोज कुमार रामबरन तिवारी हा त्याच्या ताब्यातील स्कॉर्पिओ गाडी कोकण एक्स्प्रेस हॉटेलसमोरील रस्त्यावर गाडी मागे घेत होता. या वेळी त्याची मोटरसायकलीस धडक बसली. झालेल्या अपघातात मोटरसायकलस्वार मिकदाद शब्बीर सुरतवाला (वय ३२) हा गंभीररित्या जखमी होऊन त्यात त्याचा मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# आरोग्य तपासणी शिबिराबाबत आढावा बैठक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील प्रभाग क्रमांक १७ येथे येत्या रविवारी (दि. १६) मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषधे वाटप महाशिबिर होणार आहे. या शिबिराच्या निमित्ताने त्वचारोग सहायक समितीची आढावा बैठक झाली.

भाजप ज्येष्ठ नेते जगदीश घरत, प्रभाग क्रमांक १७चे अध्यक्ष विजय म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेविका सुशीला घरत यांच्या नवीन पनवेलमधील जनसंपर्क कार्यालयात रविवारी (दि. ९) सकाळी ही बैठक झाली.

या वेळी समिती सदस्य सुधाकर थवई, राजाराम शिंदे, चंद्रकांत पाटील, विश्वास पवार, राजेंद्र नारकर, प्रशांत आवळे,अमित पाटील, संदिप नारायण पाटील, रावसाहेब खरात, संदीप बाळाराम पाटील, किशोर राजपूत, रतन नेमाडे, मयुरी उनडकट, अनंत जाधव, राजेश उनडकट, आकाश दीग्गेवाडी, किशोर वाहुळकर, सुदाम गायकर, राहुल वाहुळकर, सचिन किर, अमोल लहाने, राम खवले, राम येडे, आनंद जाधव, गोरख खवले, राजू झिरे, हिरामण साळुंके आदी उपस्थित होते.

# वाल्मिकी ऋषींच्या जयंतीनिमित्त अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या मुख्यालयात रविवारी (दि. ९) वाल्मिकी ऋषींच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, पालिका अधिकारी कर्मचारी तसेच राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघचे अध्यक्ष शरद कांबळे, महासचिव चींडालिया उपस्थित होते.





**पनवेल : तालुका अखंड भंडारी सेवा मंडळ आणि श्री नारायण बाबा चॅरीटेबल ट्रस्टच्या वतीने रविवारी आरोग्य तपासणी शिबिर राबविण्यात आले. शुश्रुषा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलच्या सहाकार्याने हे शिबिर रेल्वे स्टेशन रोडवरील साईनारायण बाबा आश्रममध्ये राबवविण्यात आले. या वेळी डॉ. दीपक खोत, डॉ. संजय तारलेकर, डॉ. मुकूंद तलाठी, डॉ. वैभव ठक्कर, डॉ. हेमंत पाटील, डॉ. लक्ष्मण आवटे आदी उपस्थित होते.**






**खारघर : भाजप महिला मोर्चा पनवेल शहर उपाध्यक्ष सुहासिनी केकाणे यांचे सुपूत्र राहूल केकाणे तसेच प्रशांत गुप्ता यांनी सेक्टर १२ येथे लस्सी कॉर्नर सुरू केले आहे. यानिमित्त भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी कॉर्नरला भेट देत राहुल केकाणे व प्रशांत गुप्ता यांना यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कॉर्नरचे उद्‌घाटन भाजप पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. या वेळी भाजप शहर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटले, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, गुरुनाथ गायकर तसेच सुहासिनी केकाणे, संतोष शर्मा, गिरीश गुप्ता, शैलेन्द्र त्रिपाठी आदी उपस्थित होते.**

# पनवेलमधून सैनिकांसाठी पौष्टिक लाडूंची भेट



**पनवेल : वार्ताहर**

भारतीय सैनिकांबद्दल देशवासीयांच्या मनात नेहमीच आदर असतो. या सैनिकांबद्दल असलेल्या प्रेम व कृतज्ञतेपोटीच दिवाळी भेट म्हणून सीमेवरील सैनिकांसाठी पनवेलमधून २६ हजार ५०० पौष्टिक लाडू पाठवण्यात आले आहेत.

देशातील प्रमुख सणांमध्ये दिवाळी हा एक सण आहे. या सणामध्ये एकमेकांना भेटवस्तू देऊन आपण आनंद वाटून घेत असतो. यासाठी आपले जवान मात्र सीमेवर डोळ्यात तेल घालून पहारा देत असतात. त्यामुळे या जवानांनाप्रति आपुलकी व्यक्त करताना त्यांचीही दिवाळी गोड करण्यासाठी भारतीय विकास परिषदेकडून गेल्या तीन वर्षांपासून सीमेवर फराळ पाठवला जात आहे. यंदाही संस्थेकडून २६ हजार पौष्टिक लाडू, ९७५ किलो शेव आणि ९०० किलो चकली पाठविण्यात येणार असून काही दिवसांपूर्वी लडाख, सियाचीन परिसरातील सैनिकांसाठी दोन हजार पॅकेट पाठवली आहेत लेह, लडाख येथील हवामानाचा अंदाज घेऊन नुकतीच दोन हजार लाडवांची पहिली खेप पाठवण्यात आली. उर्वरित लाडू जम्मू, उधमपूर, अरुणाचल प्रदेश, अखनूर, तवांग, भूज या परिसरात पाठविण्याची प्रक्रिया सुरू आहे.

लाडूंच्या बॉक्ससोबत शुभेच्छा पत्रातून जवानांच्या प्रतीची कृतज्ञता व्यक्त केली जाते. ज्योती कानेटकर, पदाधिकारी, भारतीय विकास परिषद, यांचा सहभाग मोलाचा असून हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी भारतीय विकास परिषदेचे पदाधिकारी सुभेद भिडे, नितीन कानिटकर, शेखर बर्वे आणि पद्मजा कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविला जातो. दिवाळीपूर्वी फराळ पोहचवण्यासाठी नियोजन हा फराळ दिवाळीपूर्वी जवानांच्या हाती पडेल, यासाठीचे नियोजन केले जाते. फराळ पाठवण्यापूर्वी प्रत्येक पदार्थाची गुणवत्ता, टिकाऊपणा, वापरलेले साहित्य आणि पदार्थ पाठविण्यासाठी लष्कराचे नियम याचे काटेकोरपणे पालन केले जाते. यासाठी जुलै महिन्यापासून लष्कराबरोबर पत्रव्यवहार करून परवानगीनंतर उपक्रमाच्या कामाला सुरुवात होते.

# मानवता फाउंडेशनच्या नवनियुक्त्या जाहीर

**पनवेल : वार्ताहर**

मानवीय मूल्यांचे रक्षण करून सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या मानवता फाउंडेशन संघटनेच्या नवनियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत.

या वेळी अध्यक्ष संजय पवार, महाराष्ट्र कार्याध्यक्ष प्रशांत अनगुडे, रंजना गायकवाड, महिला अध्यक्षा स्वाती पांचाल उपस्थित होते. यामध्ये कविता राणे – उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य, प्रतीक्षा गवंडी – सचिव महाराष्ट्र राज्य, रेश्मा मांडवकर – सह सचिव महाराष्ट्र राज्य, ताजबिर खान आपा – वॉर्ड अध्यक्षा मुंबई १४५ यांची नियुक्ती करण्यात आली असून या नियुक्तीबदल अनेकांनी त्याचे अभिनंदन केले आहे.



# ईद मिलादून नबी उत्सवाचा जुलूस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरातील हजरत पीर जमाल शाह दर्गा ट्रस्टच्या वतीने ईद मिलादून नबी उत्सवाच्या निमित्ताने मोठ्या उत्साहात भाविकांचा जुलूस काढण्यात आला.



पनवेल तक्का विभागातील दर्गा परिसरातून दर्गा प्रमुख शेख जावेद बाबा, सिझान शेख आदी प्रमुख मान्यवरांसह भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पत्रकार सय्यद अकबर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. नारे तकबीर अल्लाह हू अकबर आदी नबींच्या आदरांसह हिंदुस्तान जिंदाबाद, भारत माता की जयच्या घोषणा या वेळी देण्यात आल्या. आजचा दिवस हजरत मोहम्मद सल्ललाऊ अलेही वसल्लम यांचा जन्मदिन आहे. त्या निमित्ताने आज सर्वत्र प्रार्थना, जुलूस आदीद्वारे आपली श्रद्धा व्यक्त केली जाते.

आपण ज्या मातीमध्ये जन्मलो त्या जन्मभूमीवर आपली श्रद्धा हवी आहे. ज्या देशात राहतो त्यावर आपली निष्ठा असली पाहीजे. नबींच्या सुधारणावादी विचारांच्या अगोदर अनेक चुकीच्या प्रथा होत्या. त्यांनी आपल्या ईश्वरी आदेशानुसार सर्वांना प्रेषित म्हणून सन्मार्गावर आणले. तत्कालीन अनिष्ट प्रथा थांबवल्या. महिलांना सन्मानजनक स्थान दिले. कुटूंबातील आईला कुटुंबातील महत्वाचा दर्जा दिला. माणुसकीची तत्वे शिकवली. लग्न, कुटुंब व्यवस्था याबाबतीत सुधारणावादी विचार दिले. जगाला शांततेतचा संदेश दिला. समाज सुधारणेचे सर्वच बाबतीत आदर्श दिले. त्यामुळे जगभरातील मुस्लिम आदर्श जीवन जगत आहेत, अशी माहिती पत्रकार सय्यद अकबर यांनी दिली.

## संपादकीय

# सहानुभूतीवर मदार

कुठल्याही राजकीय पक्षात फूट पडल्यानंतर आजवर निवडणूक आयोगाने त्या पक्षाच्या चिन्ह आणि नावाबाबत जी भूमिका घेतली आहे, तीच भूमिका निवडणूक आयोगाने शिवसेनेतील फुटीनंतर शिवसेनेबाबत घेतली आहे. मात्र, तरीही जणु काही आपल्यावरच अन्याय झाल्यासारखी आवई उठवून सहानुभूतीचे राजकारण खेळण्याचा प्रयत्न उद्धव ठाकरे गटाकडून सुरू आहे, पण महाराष्ट्राची जनता सूज्ञ असून ती अशा भंपक भावनिक आवाहनांना बळी पडणार नाही.

**अंधेरी पोटनिवडणुकीच्या तोंडावर शिवसेनेचे 'धनुष्यबाण' हे चिन्ह आपल्याला मिळावे असा दावा करणारी याचिका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने केली होती. त्यावर केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेनेच्या शिंदे गट व उद्धव ठाकरे गट या दोन्ही गटांना आपली बाजू मांडण्याची पुरेपूर संधी देऊन अखेर शनिवारी शिवसेनेचे 'धनुष्यबाण' हे चिन्ह गोठवण्याचा निर्णय घेतला. त्यासोबतच शिवसेना हे नावही स्वतंत्रपणे वापरण्यास मनाई करणारा अंतरिम आदेशही आयोगाने या दोन्ही गटांना दिला. हे दोन्ही निर्णय अंधेरी पोटनिवडणुकीसाठी असल्याचेही आयोगाने पुरते स्पष्ट केले. सोमवारपर्यंत आपल्या पक्षाचे नवीन नाव आणि चिन्ह सुचवावे अशी सूचनाही आयोगाने दोन्ही गटांना केली. या संपूर्ण कार्यवाहीदरम्यान उद्धव ठाकरे गटाकडून प्रत्येक टप्प्यावर वेळकाढूपणा करण्यात आल्याचा आरोप शिंदे गटाकडून यापूर्वीच करण्यात आला आहे. आयोगाने चिन्ह गोठवल्यानंतर अपेक्षेप्रमाणे उद्धव ठाकरे गटाकडून 'लोकशाहीचा मुडदा' पाडण्यात आल्याची ओरड सुरू झाली. आणि देशातील लोकशाही व्यवस्थेबद्दल लोकांच्या मनात शंका निर्माण होईल अशी विधाने करण्यात आली. जनतेची सहानुभूती मिळवण्यासाठी ठाकरे गटाकडून पद्धतशीरपणे हे सारे करण्यात येत असल्याची टीका मग शिंदे गटाने करणे स्वाभाविकच होते. आमच्याकडे संख्याबळ असल्याने आम्हालाच चिन्ह मिळेल असे वाटले होते म्हणून आम्ही नव्या चिन्हाच्या पर्यायांचे निवेदन आयोगाकडे अद्यापही दिलेले नाही, परंतु ठाकरे गट मात्र जणु काही चिन्ह गोठवले जाण्याची वाटच पाहात असावा, त्यामुळेच त्यांनी तातडीने आयोगाकडे नव्या चिन्हाचे व नव्या नावाचे पर्याय दाखल केले असा आरोप शिंदे गटाकडून करण्यात आला. उद्धव ठाकरे यांनी रविवारी संध्याकाळी केलेल्या फेसबुक लाइव्हमध्ये नव्या चिन्हाचे तिन्ही पर्याय जनतेला दाखवले. नावाच्या तिन्ही पर्यायांचाही त्यांनी आपल्या भाषणात स्पष्ट उल्लेख केला. दिवंगत मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांची आठवण करून देऊन, आयोगाने त्यांच्याप्रमाणे नि:पक्षपातीपणाने काम करून लवकरात लवकर आपल्याला नवे नाव आणि चिन्ह द्यावे अशी टिप्पणीही ठाकरे यांनी केली. वास्तवत: यापूर्वी अनेक राजकीय पक्षांच्या फुटीच्या वेळी निवडणूक आयोगाकडून नेमकी हीच पावले उचलण्यात आली असून शिवसेनेसंदर्भात आयोगाने काहीही वेगळे केलेले नाही. तरीही स्वायत्त संस्थांची पायमल्ली सत्ताधाऱ्यांकडून सुरू असल्याचे भासवण्याचा पुरेपूर प्रयत्न ठाकरे गटाकडून केला जातो आहे. भारतीय जनता पक्षाचे नाव न घेता त्यांनी भारतीय जनता पक्षाकडेही या साऱ्या घडामोडींच्या संदर्भात अंगुलीनिर्देश केला, परंतु भाजपने या साऱ्यापासून स्वत:ला पूर्णत: दूर ठेवले आहे. अंधेरीची पोटनिवडणूक असो वा आगामी मुंबई महापालिका निवडणूक उद्धव ठाकरेंची अवघी मदार सहानुभूतीच्या राजकारणावरच आहे हे उघड आहे, परंतु मराठी जनता काही दूधखुळी नाही. त्यामुळे हे सोंग फार काळ चालणार नाही हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईलच.**

# परतीचा पाऊस लांबल्याने बळीराजा धास्तावला

**खबरबात**
**विजय मांडे**



यंदा पाऊस थोडा उशिराच सुरू झाला. तरीही सातत्याने पाऊस पडत असल्याने शेतकरी वर्ग आनंदी होता. पेरण्या, लावण्या, गवत काढून झाले. पिके चांगली डोलू लागली. गणपतीचा सण झाला. नवरात्रोत्सव होऊन दसरासुद्धा झाला. या सर्व सणांना पावसाची आवर्जून हजेरी होती. त्यानंतर परतीचा पाऊस येईल आणि दिवाळी सणाच्या पूर्वी शेतातील पिकलेले धान घरी घेऊन येऊ, असे मनसुबे शेतकरी बांधवांनी रचले होते. या सर्वांवर दररोज दिवस न दिवस पडणाऱ्या पावसाने विरजण टाकले आणि शेतकरीवर्ग कमालीचा धास्तावला.

रायगड जिल्हा म्हणजे भाताचे कोठार समजले जाते. आता तरुणवर्ग भातशेती करायला पुढे येत नाही. याचे कारण लहरी हवामान. या हवामानाचा फटका नेहमीच भातपिकाला बसतो आणि हाता तोंडाशी आलेला घास हिरावला जातो. भातपीक पिकवणे म्हणजे आतबट्ट्याचा व्यवहार झाला हा आतापर्यंतचा अनुभव आहे. तसेच गेल्या दहा-बारा वर्षांपूर्वी जमिनीचे दर दुप्पट, तिप्पट झाले. त्यामुळे कर्जबाजारी असलेल्या शेतकऱ्यांनी आपली काही जमीन विकण्याचा निर्णय घेतला. काहींनी जमीनी मुंबईकरांना विकल्या आणि दुर्दैव म्हणजे जमीन मालक होते ते शेतकरी ज्यांना जमिनी विकल्या त्यांच्या फार्म हाऊसवर वॉचमन म्हणून राहिले. आणखी एक दुर्दैव असे की जमीन विकताना वारसा हक्काने बहिणींना हिस्सा देण्यावरून काहींचे रक्षाबंधन आणि भाऊबीज कायमची बंद झाली.

ऑक्टोबर महिना म्हणजे 'ऑक्टोबर हिट' असा अनुभव आहे, मात्र या महिन्याचे दहा दिवस जात आले तरी जून-जुलै महिण्यासारखा पाऊस कोसळत आहे. त्यामुळे शेतकरीवर्गाचे नुकसान होतेच, शिवाय जनसामान्यांचे जीवनमानसुद्धा विस्कटून जाते. दिवाळीचा दिवा पाहिल्याशिवाय पाऊस जात नाही असा जुन्या लोकांचा अनुभव आहे आणि तो ते बोलूनही दाखवत असतात, मात्र आता काही हवामान तज्ज्ञांनी यंदाचा पाऊस जानेवारी महिन्यापर्यंत असणार असल्याचा अंदाज वर्तवला असल्याने शेतकऱ्यांच्याच नव्हे; तर सर्वांच्याच तोंडचे पाणी जाणार आहे. आताचा पडणारा पाऊस पाहिला तर हा अंदाज खरा ठरतो की काय? असे वाटू लागते आणि हा अंदाज खरा ठरला तर काय होईल? अजूनही वेळ गेलेली नाही. आता पाऊस थांबला तरी पिके वाचतील, मात्र असाच आठ दहा दिवस वादळी वाऱ्यासह पाऊस पडला तर भातशेतीचे खूप नुकसान होईल. तालुक्याच्या काही भागात उन्हाळी भातशेती पिकवली जाते. राजनाला विभागात याच पिकाच्या आशेवर शेतकरी असायचे. तेसुद्धा काही वर्षे विस्कळीत झाले आहे. त्यामुळे भातपिकाऐवजी दुसरी पिके घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल गेल्याने आता तीच पिके घेणे त्यांना फायदेशीर होत आहे.

अजून दोन-तीन महिने पाऊस पडणार असेल, तर रब्बी हंगामाचे काय? कडधान्य पिकवता आले नाही तर काय? करायचे यात शेतकरी बांधवांचे नुकसान होणारच आहे, पण सर्वसामान्यांचे काय हाल होतील हे देवच जाणे. आधीच महागाई आणि त्यात हे असे लहरी हवामान म्हणजे माणसांनी जगायलाच नको अशी परिस्थिती होऊन बसेल. दुसरे म्हणजे दिवाळीनंतर होणारी शुभकार्ये कशी करायची? ती झाली नाही तर त्यावर अवलंबून राहणारे उदा. मंडप डेकोरेटर्स वाले, जेवण बनवणारे, मंगल कार्यालये, बसते बांधण्यासाठीची कपड्यांची दुकाने, सोन्या-चांदीची दुकाने, लग्नसराईसाठी लागणाऱ्या वाहनांचे काय करायचे? असे एक ना अनेक प्रश्न उद्भवणार आहेत. त्यामुळे निसर्गचक्र बदलत आहे. त्याचा सामना कसा करायचा किंवा त्याच्याबरोबर आपणही बदलायचे काय? हे ठरवण्याची ही वेळ आहे.

# जागतिक मानसिक आरोग्य दिन



प्रत्येक जण मानसिक दबावातून जात आहे. पण, फार कमी लोक त्याला महत्त्व देतात. या अज्ञानामुळे तो मानसिक तणाव, नैराश्य, उन्माद, स्मृतिभ्रंश, फोबिया यासारख्या मानसिक आजाराचा बळी ठरतो. जागतिक मानसिक आरोग्य दिवस हा दिवस म्हणजे १० ऑक्टोबर रोजी जगभरात मानसिक आरोग्याचे महत्त्व स्पष्ट करण्यासाठी साजरा केला जातो. लोकांमध्ये मानसिक समस्यांविषयी जागरूकता पसरवणे हा त्याचा हेतू आहे.

जागतिक मानसिक आरोग्य दिवस १९९२पासून सुरू झाला आहे. त्याची सुरुवात संयुक्त राष्ट्रांचे उपमहासचिव रिचर्ड हंटर आणि वर्ल्ड फेडरेशन फॉर मेंटल हेल्थ यांच्या पुढाकाराने झाली. या महासंघामध्ये १५० हून अधिक देश सहभागी होते. १९९४ मध्ये संयुक्त राष्ट्रांचे तत्कालीन महासचिव यूजीन ब्रॉडी यांनी हा दिवस थीमसह साजरा करण्याचे सुचवले. तेव्हापासून, मानसिक आरोग्याचे महत्त्व स्पष्ट करण्यासाठी दरवर्षी १० ऑक्टोबर रोजी जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा केला जातो.

वर्ल्ड फेडरेशन फॉर मेंटल हेल्थचे अध्यक्ष डॉ इंग्रिड डॅनियल्स यांनी २०२१ च्या जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त या वर्षीचे 'एक असमान जगात मानसिक आरोग्य' घोषित केले आहे. ही थीम निवडण्यामागचा हेतू हा आहे की आजच्या कोरोना युगात श्रीमंतापासून गरिबांपर्यंत प्रत्येकजण मानसिक आजारांनी ग्रस्त आहे. पण, आजही सामाजिक आणि आर्थिक स्थितीनुसार समाजात भेदभाव खूप वाढला आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे, आपण आपल्या धकाधकीच्या जीवनात अडकत चाललो आहोत, ज्यामुळे आपण दृष्टिक्षेप, स्मृतिभ्रंश, उन्माद, चिंता, स्वयंपूर्णता यासारख्या अनेक मानसिक समस्यांनी घेरले जात आहोत. कोणत्याही प्रकारची मानसिक समस्या असल्यास आपण वैद्यकीय मदत घ्यावी. या दिवसाद्वारे, लोकांमध्ये मानसिक आरोग्याचे महत्त्व समजावून सांगण्याचा प्रयत्न केला जातो. यासह त्यांचे मित्र, नातेवाईक आणि समाजानेही हे समजून घेणे आवश्यक आहे.

२०१५-१६ मध्ये झालेल्या एका राष्ट्रीय सर्वेक्षणानुसार, भारतात दर ८ पैकी एक व्यक्ती म्हणजे सुमारे १७.५ कोटी लोक कोणत्या ना कोणत्या मानसिक आजाराने ग्रस्त आहेत. यापैकी २.५ कोटी लोक गंभीर आजारांनी ग्रस्त आहेत. त्यांना त्वरित मानसिक मदतीची गरज आहे.

**(साभार : एक्झाम्स हॉल)**




## ५जीच्या युजर्सना मिळणारे 'हे' मोठे फायदे




भारतात ५जी सेवा सुरू करण्यात आली आहे. दूरसंचार कंपन्या ५जी सेवा काही शहरांमध्ये सुरू करत आहेत. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला ५जी सेवा पूर्णपणे सुरू झाल्यानंतर युजर्सना कोणते फायदे मिळतील? याबद्दल सांगणार आहोत.

दरम्यान, ५जी सेवा पूर्णपणे सर्वत्र सुरू होताच, तुम्हाला हाय स्पीड इंटरनेटचा अनुभव मिळू लागेल. ५जी ही एक अशी सेवा आहे, ज्याची प्रत्येकजण वाट पाहत आहे, कारण हाय स्पीड इंटरनेट ही आज लोकांची गरज बनली आहे आणि ५जी सेवा आल्यानंतर लोकांना हायस्पीड इंटरनेट वापरण्याचा अनुभव मिळेल.

५जी सेवेच्या आगमनानंतर, आता कॉलिंग पूर्वीपेक्षा चांगल्या क्वालिटीसह होईल आणि यादरम्यान कोणताही व्यत्यय येणार नाही. कारण बर्याच वेळा ४जी नेटवर्कमध्ये कॉल करताना समस्या असायची, परंतु ५जी सेवेमुळे अशी कोणतीही समस्या होणार नाही.

५जी सेवेद्वारे तुम्हाला हाय स्पीड इंटरनेट बघायला मिळेल, इतकेच नाही तर तुम्हाला एक चांगला डाउनलोडिंग स्पीड देखील मिळेल, जो या सेवेचा एक मोठा भाग आहे. ५जी इंटरनेटमुळे युजर्स हेवी फाइल्स लवकर डाउनलोड करू शकतील.

कॉल ड्रॉपची समस्या ४जी नेटवर्कमध्ये सामान्य आहे आणि अनेक वर्षांपासून युजर्सना याचा त्रास होत आहे. ५जी नेटवर्क आल्यानंतर आता युजर्सची या समस्येपासून सुटका होणार आहे आणि कॉलिंग दरम्यान कोणतेही कारण नसताना अचानक कॉल कट होणार नाही, ज्यामुळे या सेवेचा मोठा फायदा होणार आहे.

४जी सेवेतील एक प्रमुख समस्या ही होती की, अनेक भागांमध्ये नेटवर्क पूर्णपणे गायब झाले होते आणि बर्याच भागात ते चांगले होते, परंतु ५जी सेवा सुरू केल्यानंतर, तुम्हाला सर्वत्र नेटवर्कचे सर्वोत्तम कव्हरेज मिळेल, ज्यामुळे कॉलिंग करणे आणि इंटरनेटचा वापर अधिक सुलभ होईल.

# सौंदर्याची खाण अन् सदाबहार अभिनेत्री रेखा



भानुरेखा गणेशन ऊर्फ रेखा ही एक भारतीय चित्रपट अभिनेत्री आहे. रेखाने अनेक हिंदी चित्रपटांमध्ये उत्तम भूमिका केल्या. १९८० मध्ये प्रदर्शित झालेल्या 'फटाकडी' या मराठी चित्रपटामध्ये 'कुठं कुठं जायाचं हनिमुनला..' या लावणीवर तिने केलेले नृत्य प्रचंड गाजले. रेखा ही राज्यसभा सदस्य आहे. राष्ट्रपतींच्या विशेष अधिकाराने

**निमित्त**

मे २०१२ मध्ये तिची राज्यसभेवर नेमणूक झाली. रेखाचा जन्म १० ऑक्टोबर १९५४ साली चेन्नईत झाला. तिचे वडील जेमिनी गणेशन तमिळ अभिनेते होते आणि आई पुष्पावली तेलुगू अभिनेत्री होती.

मोहन सैगल यांना त्यांच्या नव्या चित्रपटासाठी नव्या मुलीची जरूर होती. धीरेंद्र महाजनने रेखाचा मोहन सैगल यांच्याशी ओळख करून दिली. त्यांनी विचारले, 'तुला हिंदी बोलता येते?, तुला नाच येतो? ' अशा प्रकारच्या सर्वच प्रश्नांची उत्तर रेखाने नकाराने दिली. रेखाच्या आईला चिंता वाटू लागली, तिने मोहन सैगलना म्हठले, की 'हिची स्क्रीन टेस्ट घ्या'. ते म्हणाले 'काही गरज नाही, ही मुलगी माझ्या आगामी चित्रपटत काम करेल.'

'सच है'च्या सेटवरती तेच झाले, पुण्याच्या फिल्म इन्टिट्यूटमधून अभिनय शिकून आलेला चित्रपटाचा नायक नवीन निश्चल म्हणाला, 'ही काळी मद्रासीण' कुठून पकडून आणली?' पण जेव्हा सिनेमा प्रदर्शित झाला, तेव्हा एकच हंगामा झाला. नवीन निश्चल हे जितेंद्रसारखे उछल-उछल करून नाचण्याचा प्रयत्न करीत असताना या 'काळ्या मद्रासिणी'करिता गीत गात होते. 'कान में झुमका, चाल में ठुमका, लगे पचासी झटके, हो तेरा रंग है नशीला, अंग-अंग है नशीला. सिनेमागृहात प्रेक्षकांनी पडद्यावर नाणी फेकून या 'काळ्या मद्रासिणीचे स्वागत केले. आणि 'सच है' बॉक्स ऑफीसवर यशस्वी झाला. त्यानंतर पुढच्याच वर्षी, १९७१ साली, रेखाला तीन चित्रपट मिळाले, विनोद मेहराबरोबरचा 'एलान', संजय खानबरोबरचा 'हसीनों के देवता' आणि प्रेमेंद्रबरोबरचा 'साज और सनम'. १९७२मध्ये ही संख्या पाच झाली, आणि तीही बड्या अभिनेत्यांबरोबर. गोरा और काला, गाँव हमारा शहर तुम्हारा (दोन्हींचे नायक-राजेंद्रकुमार), एक बेचारा (नायक -जितेंद्र), रामपुर का लक्ष्मण (नायक -रणधीर कपूर) आणि जमीन आसमान (नायक-सुनील दत्त).

१९७३ या वर्षी रेखाचे नऊ चित्रपट प्रदर्शित झाले. बहुतेक यशस्वी ठरले. बड्या हिरोंसह हृषीकेश मुखर्जींसारख्या बड्या दिग्दर्शकांबरोबरही रेखाला कामे मिळू लागली. १९६६ पासून तिने सिनेमात काम करायला सुरावात केली. रंगूला रत्नम नावाच्या तेलुगू सिनेमात तिने बालकलाकाराची भूमिका केली. १९७० मध्ये सावन भादों या चित्रपटापासून तिने मुख्य अभिनेत्री म्हणून काम करायला सुरुवात केली.

रेखा यांनी हिंदीसोबतच तामिळ, तेलगू आणि कानडी भाषेत १८०हून अधिक सिनेमामंध्ये काम केले आहे. त्यांना चित्रपट क्षेत्रात अनेक सन्मान प्राप्त झाले आहेत.'खूबसूरत, खून भरी मांग, खिलाडियों का खिलाडी, उत्सव, मुकद्दर का सिकंदर आणि उमराव जान' या चित्रपटांमधील रेखाच्या भूमिका विशेष गाजल्या. रेखाला असंख्य पुरस्कार मिळाले आहेत. त्यातले तीन फिल्मफेअर पुरस्कार, दीनानाथ मंगेशकर पुरस्कार (२००५), पद्मश्री (२०१०), स्मिता पाटील स्मृती पुरस्कार (१७-१२-२०१७) हे उल्लेखनीय पुरस्कार आहेत.

**(साभार : विकीपीडिया)**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरुड : सुप्रसिद्ध फणसाड अभयारण्य पाच हजार तीनशे हेक्टर परिक्षेत्रात व्याप्त परिसर असून रोहा व मुरुड तालुक्यात याची व्याप्ती आहे. घनदाट अशा या अभयारण्यात निलगिरीची उंच व मोठी झाडे आहेत.** (छाया : संजय करडे)

## आरोग्य प्रहर

### आल्याचे पाणी पिण्याचे फायदे



अद्रकाचा चहा पिण्याचे अनेक आरोग्यविषयक फायदे आहेत हे बहुतेक लोकांना माहित आहे, परंतु तुम्हाला माहित आहे का की आल्याचे पाणी पिणे देखील खूप फायदेशीर आहे आणि हे पाणी अनेक आरोग्य समस्या दूर करण्यात मदत करते. आल्याचं सेवन आरोग्यासाठी लाभदायक ठरते. आल्यामध्ये अ‍ॅन्टी इंफ्लेमेट्री, अ‍ॅन्टी बॅक्टेरियल, अ‍ॅन्टी ऑक्सिडेंटशिवाय आणखीही काही पोषक तत्व असतात. चला तर जाणून घ्या, आल्याचे पाणी पिण्याचे आरोग्यदायी फायदे.

आल्यामधील या पोषक तत्त्वांमुळे सूज कमी करण्यास तसेच सर्दी-खोकला कमी करण्यास फायदेशीर ठरते. सकाळी उठल्यावर रिकाम्यापोटी आल्याचं पाणी पिण्याने संपूर्ण दिवस उत्साही, ताजेतवाने राहण्यास मदत होते. आल्याचे पाणी पिण्याने रोगप्रतिकार शक्तीही चांगली होती. पित्त झाल्यासही आल्याचं पाणी पिण्याने आराम मिळतो.

**पचनक्रिया सुधारते** - आलं रात्रभर पाण्यात भिजत ठेऊन सकाळी उठल्यावर ते पाणी पिल्याने पचनक्रिया उत्तम राहते. अपचन होण्याची समस्या कमी होते. सकाळी उठल्यावर होणाऱ्या सिकनेसची समस्याही दूर होते. तसेच फ्रेश वाटते.

**वजन कमी होते** - आल्याचं पाणी पिण्याने खाण्याची इच्छा कमी होते. तसेच शरीरात असलेले अधिक फॅट कमी करण्यासही मदत होते. आल्याचं पाणी शरीरातील रक्तातील साखरेचे प्रमाणही नियंत्रणात ठेवते.

**त्वचा आणि केसांसाठी उपयोगी** - आल्याच्या पाण्यात अ‍ॅन्टीऑक्सिडेंट मोठ्या प्रमाणात असतात. त्यामुळे केस आणि त्वचेला याचा फायदा होतो. तसेच योग्य प्रमाणात सी व्हिटॅमिन आणि ए व्हिटॅमिनही मिळेत. सी, ए व्हिटॅमिनमुळे केस आणि त्वचेला आवश्यक पोषण मिळते.

**स्नानूंना आराम मिळतो** - जे लोक जिममध्ये अधिक व्यायाम, वर्कआऊट करतात त्यांना काही वेळा मांसपेशींमध्ये वेदना होण्याची समस्या असते. अशा वेदनेसाठी आल्याचं पाणी पिण्याने ही समस्या सोडवण्यासाठी मदत मिळते.

**रोग प्रतिकारशक्ती वाढवते** - आल्याचे पाणी प्यायल्याने शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते, त्याचबरोबर सर्दी-खोकला आणि व्हायरल इन्फेक्शन सारख्या आजारांची शक्यता कमी होते.

# बदलत्या हवामानापुढे शेतकरी हतबल

## परतीचा पाऊस लांबल्याने भातपिकाचे नुकसान

**खोपोली : प्रतिनिधी**

नवरात्रोत्सवानंतर पावसाने आपल्या परतीच्या प्रवासाला सुरुवात केली खरी, मात्र तो जोरदारपणे बसरत असल्याने शेतकरीवर्गाच्या तोंडचे पाणी पळाले आहे. मोठ्या कष्टाने पिकविलेले भातपीक गमाविण्याची वेळ आल्याने शेतकरी चिंतातूर दिसत आहे.

खोपोली-खालापूर परिसरात एक आठवड्यापासून जोरदार परतीचा पाऊस सुरू आहे. परतीच्या या पावसाने तयार झालेल्या भातपिकाचे नुकसान होण्याची भीती शेतकर्‍यांना सतावत आहे.

भातपीक तयार असून अनेक ठिकाणी भात कापणीलाही सुरुवात झाली आहे, मात्र एक आठवड्यापासून अवकाळी पावसाने शेतकर्‍यांच्या हातातोंडाशी आलेला घास ही जाणार की काय अशी स्थिती निर्माण झाली आहे. शेतात मोठ्या प्रमाणावर पाणी भरत असल्याने व भातपीक आडवे झाल्याने कोंब फुटण्याची स्थिती निर्माण झाली आहे. असाच पाऊस सुरू राहिल्यास नुकसान होण्याच्या भितीने शेतकरी चिंतेत सापडला आहे.

यंदा पर्जन्यमान चांगले राहिले. त्यामुळे पीकही दमदार आले आहे, पण परतीचा पाऊस मोठ्या प्रमाणात पडत असल्याने तसेच तो लांबल्याने पीक वाया जाण्याची भीती आहे.



बदलते हवामान शेतकर्‍यांच्या मुळाशी उठत असल्याचे पहावयास मिळत आहे. त्यामुळे करायचे तरी काय, असा प्रश्न आहे.

**भातपीक तयार आहे. कापणीसाठी मजूर व अन्य जुळवाजुळव सुरू असतानाच मुसळधार पावसामुळे नुकसान होत आहे. शेतात पाणी भरले असल्याने तयार भाताला कोंब फुटण्याची भीती आहे.**

**-निवृत्ती दिसले, शेतकरी, केळवली**

## कर्जतमध्ये मुलांची पहिली ग्रामसभा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील कळंब येथे मुलांच्या ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायत तसेच सिएम सीए संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील पहिली ग्रामसभा पार पडली.



या विशेष ग्रामसभेत मुलांनी शिक्षण, पाणी व स्वच्छता, सुरक्षितता, आरोग्य, गाव विकासाबद्दलचे प्रश्न विचारले व मान्यवरांनी प्रश्न कसे मार्गी लागतील यासाठी मार्गदर्शन केले. कळंब येथील श्री दत्त मंदिराच्या सभामंडपात आयोजित या ग्रामसभेत उपस्थितांचे स्वागत मोहन चव्हाण यांनी करून प्रास्ताविकात उपक्रमाची माहिती सांगितली. नेरळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर यांनी मार्गदर्शन करताना, मुलांनी बदलत्या परिस्थितीत आपले हक्क बजावताना जबाबदारीची जाणीव ठेवणे गरजेचे असल्याचे सांगितले.

भारताचे भावी नागरिक चिंतनशील, संवेदनशील घडवण्याचे काम ही संस्था करीत आहे. सामाजिक जाणिव व जबाबदार भावी नागरिक घडवण्यासाठी संस्थेचे कार्य कौतुकास्पद आहे, असे म्हटले.

पोलीस उपनिरीक्षक माधुरी मुळीक यांनी, मुलांनी मोबाइलचा अतिरिक्त वापर टाळला पाहिजे. सायबर गुन्ह्यापासून लांब राहून करियर घडवण्याकडे लक्ष केंद्रित करणे गरजेचे असल्याचे सांगितले. मुलाच्या सुरक्षेसाठी चाईल्ड हेल्पलाईन १०९८ व मुलीच्या एकंदरीत सुरक्षेसाठी ११२ ही हेल्पलाईन वापरावी, असे आवाहनही केले.

कळंब आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी योगेश पाटील यांनी, चांगल्या आरोग्यासाठीचे उपाय यावर मार्गदर्शन केले. कोकण शिक्षण संस्थेचे मुख्याध्यापक सुभाष देशमुख, चौधरी, परिजाडे दामियात, सरपंच माधुरी बदे, ग्रामसेवक बुरुड, नीता गाडगे आदींनीही संबोधित केले. गाव प्रेरक म्हणून सुवर्णा कोरडे व निखिल चोंडकर यांनी काम केले. सूत्रसंचालन मोहन चव्हाण यांनी केले. संस्थेचे वरिष्ठ अधिकारी प्रिया नंबियार, प्रीता देशमुख, प्रिया कृष्णमूर्ती, विनोदिनी लुल्ला आदी उपस्थित होते.

## पोलादपूरमध्ये आज प्रहार संघटनेचा अपंग मार्गदर्शन मेळावा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड व पोलादपूर तालुक्यातील अपंगांना मार्गदर्शन करण्यासाठी आमदार बच्चू कडू यांच्या प्रहार अपंग क्रांती संस्थतर्फे कॅ. विक्रमराव मोरे सभागृहात मेळाव्याचे आयोजन सोमवारी (दि. १०) सकाळी ११ वाजता करण्यात आल्याची माहिती संघटनेचे महाड व पोलादपूर तालुका अध्यक्ष फैज उमर हुर्जूक यांनी दिली. या मेळाव्याला सत्ताधारी शिंदे गटाचे प्रतोद आमदार भरत गोगावले यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या मेळाव्यास प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, तहसीलदार दिप्ती देसाई, मुख्याधिकारी कोमल कराळे, गटविकास अधिकारी धनंजय जगताप, वैद्यकीय अधिकारी डॉ. भाग्यरेखा पाटील, पोलीस निरिक्षक युवराज म्हसकर आदींसह नगराध्यक्ष सोनल गायकवाड, उपनगराध्यक्ष नागेश पवार, पाणीपुरवठा सभापती प्रसाद इंगवले, महिला व बालकल्याण सभापती अस्मिता पवार, विरोधी गटनेते दिलीप भागवत, माजी जि. प. सदस्य चंद्रकांत कळंबे, माजी पं. स. सभापती शैलेश सलागरे तसेच प्रहार अपंग क्रांती संस्थेचे महाड व पोलादपूर तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या वेळी अपंगांना राज्य व केंद्र सरकार तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत मिळणार्‍या सोयीसुविधा व सवलतीच्या योजनांबाबत विविध विभागांचे अधिकारी माहिती देण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे अपंग तसेच त्यांच्या नातेवाईकांनी अधिकाधिक संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संघटनेचे फैज उमर हुर्जूक यांनी केले आहे.

## आंबा उत्पादकांची बुधवारी परिषद

**पाली : प्रतिनिधी**

हवामानबदलाचा फलोत्पादनावर होणारा परिणाम, त्यानुसार आवश्यक असलेली कृषिप्रक्रिया, सिंचनव्यवस्था यावर बुधवारी (दि. १२) चर्चा होणार आहे. महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक असोसिएशनने मुंबईत या संबंधीची महत्त्वाची परिषद आयोजित केली आहे. पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर या परिषदेला उपस्थित राहणार आहेत.

मागील चार ते पाच वर्षांत हवामानबदल हे जागतिक आव्हान ठरले आहे. त्याचा मोठा परिणाम कृषी फलोत्पादन क्षेत्रावर झाला आहे. या विषयावर चर्चा करण्यासाठी ही परिषद आयोजिल्याचे असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी पाली सुधागड येथे शेतकर्‍यांशी संवाद साधताना सांगितले. फोर्ट भागातील के. दुभाष मार्गावरील जहांगीर कला दालनामागील एम. सी. घिया सभागृहात दुपारी ४ वाजता ही परिषद होत आहे. डॉ. काकोडकर यांच्याखेरीज केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संस्थेच्या संचालिका डॉ. सुजाता सक्सेना, स्टेट बँकेचे मुख्य महाव्यवस्थापक अजयकुमार सिंह, मुंबई शेअर बाजाराचे समीर पाटील, कोकण कृषी विद्यापीठ दापोलीचे माजी संचालक डॉ. यू. व्ही. महाडकर यांच्यासह कृषी तसेच सिंचन क्षेत्रातील तज्ज्ञ या परिषदेत मार्गदर्शन करणार आहेत.

## आरएसएसचे मुरूडमध्ये पथसंचलन



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुका राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) विजयादशमीनिमित्त मुरूड शहरात शानदार पथसंचलन झाले. पथसंचलनात तालुक्यातून १५ गावांतून स्वयंसेवक सहभागी झाले होते.

मुरूड शहरातील श्री शिवाजी चौक, गोल बंगला, श्री लक्ष्मी नारायण मंदिर, आझाद चौक, बाजारपेठ, श्रीराम भवन ते श्रीकाळ भैरव मंदिरापर्यंत हे संचलन झाले. तालुका कार्यवाह समीर उपाध्ये, सहकार्यवाह प्रा. अनुपसिंह यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या संचलन सोहळ्याचा समारोपही शिस्तबद्ध रितीने श्री काळ भैरव मंदिराच्या प्रांगणात झाला.

या वेळी हिंदू एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष दिलीप जोशी, प्रा. मेघराज जाधव यांच्या हस्ते शस्त्र पूजन करण्यात आले. कुमार आर्कशी यांनी संघटनेचे पद्य गायले.

## पोलादपुरात वन्यजीव सप्ताह

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्याच्या ग्रामीण भागात वन्यजीव सप्ताहानिमित्त ग्रामीण भागातील शेतकरी ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांमध्ये जनजागृतीपर मार्गदर्शनाचे आयोजन तालुका वन विभागामार्फत करण्यात आल्याची माहिती परिमंडळ पोलादपूरचे वनपाल शाम गुजर यांनी दिली.



सडवली, काटेतळी, वाकण खांबेश्वरवाडी, परसुले, क्षेत्रपाळ व दिसेधोंड-रानबाजिरे या राजिपच्या प्राथमिक शाळांमध्ये वन्यजीव सप्ताहानिमित्त बिबटे, रानडुक्कर आणि रानगवे यांच्या वावराबद्दल तसेच या वन्यजीवांपासून संरक्षणासंदर्भात माहिती देण्यात आली.

या वेळी दिलीप जंगम, प्रशांत गायकर आणि प्रियंका जाधव आदी वनरक्षकांनी विविध शाळांमध्ये तसेच गाववस्त्यांमध्ये जाऊन जनजागृती केल्याने या सप्ताहाचे आयोजन यशस्वी झाल्याचे या वेळी परिमंडळ पोलादपूरचे वनपाल शाम गुजर यांनी सांगितले.

## फणसाड अभयारण्यात वन्यजीव सप्ताहाची सांगता

**मुरूड : प्रतिनिधी**

फणसाड अभयारण्य, ग्रीन वर्क ट्रस्ट आणि अंशु फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने १ ते ७ ऑक्टोबरदरम्यान वन्यजीव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त विविध उपक्रम घेण्यात आले. या सप्ताहाची सांगता झाली आहे.

वन्यजीव सप्ताहाच्या प्रारंभी श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय, यशवंतनगर, नांदगाव येथील इयत्ता पाचवी ते आठवीच्या दोन गटांत विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाची आवड निर्माण व्हावी, वन्यजीव, पक्षी व वृक्षांचे संवर्धन व्हावे यासाठी पीपीटीद्वारे सादरीकरण करण्यात आले. ग्रीन वर्क ट्रस्टचे निखिल भोपाळे यांच्या सदस्यांनी नवीन गिधाड ई-कार्ड उपक्रम घेतला. सप्ताहाच्या समारोपावेळी माध्यमिक विद्यालय काशीद येथील विद्यार्थ्यांची चिकणी गावातून जनजागृतीपर प्रभातफेरी काढण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांना वन्यजीव व जैवविविधतेबाबत पीपीटीद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी वन्यप्राण्यांच्या माहितीवर आधारित स्पर्धेतील यशस्वी स्पधर्कांना बक्षिसे वितरीत करण्यात आली. या कार्यक्रमास फणसाड अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी तुषार काळभोर, काशिद वनपाल एस. एल. शिंदे, सुपेगाव वनपाल ए. व्ही. तांडेल, एस. बी. पाटील, ग्रीन वर्क ट्रस्टचे निखिल भोपाळे, अंशु फाउंडेशनचे निलेश गुंड, चिकणी ग्रामस्थ, वनकर्मचारी, शिक्षकवृंद व विद्यार्थीवर्ग उपस्थित होता.





## चला जाणूया नदीला...


भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ७५ नद्यांच्या परिक्रमेचा शुभारंभ राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी झाला. नदी परिक्रमा नेमकी कशी असेल याचा उद्देश काय असेल याविषयी हा लेख...

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त विविध अभियानाचे आयोजन राज्यभरात करण्यात येत आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्ताने वर्धा येथे राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा समारोप, हॅलोऐवजी वंदे मातरम् अभियानाचा शुभारंभ, वर्धा जिल्हाधिकारी कार्यालय आणि नियोजन भवनाचे उद्घाटन याबरोबरच ७५ नद्यांच्या परिक्रमेचा शुभारंभ कार्यक्रम वर्ध्यातील जिल्हा क्रीडा संकुल येथे झाला. या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, मॅगसेसे पुरस्कार विजेते आणि जलबिरादरीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजेंद्र सिंह यांची प्रमुख उपस्थिती होती.

महाराष्ट्रातील नद्यांचे आरोग्य चांगले राहिले तरच आपले आरोग्य चांगले राहणार आहे आणि हेच ओळखून महाराष्ट्रातील गोदावरी, कृष्णा, तापी, नर्मदा, पश्चिम वाहिन्यांच्या खोर्‍यातील एकूण ७५ नद्यांचे संवर्धन करण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. वर्धा येथील सेवाग्राममध्ये चला जाणूया नदीला या महोत्सवाचेदेखील आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील ७५ नद्यांचे संवर्धन करीत असताना राज्यातील नद्यांची सद्यस्थिती नेमकी काय आहे तसेच नदी संवर्धन करताना काय करणे आवश्यक आहे याची दिशा मिळण्यास या महोत्सवाच्या माध्यामातून मदत होणार आहे. या राज्य शासनाच्या उपक्रमात लोकसहभाग मिळाला तरच हा महोत्सव यशस्वी होणार आहे.

या अभियानाचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली असून याबाबतचा शासन निर्णय पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाने निर्गमित केला आहे. गठित करण्यात आलेल्या समितीत मुख्य सचिव हे अध्यक्ष असतील. महसूल विभागाचे आणि ग्राम विकास विभागाचे अपर मुख्य सचिव हे सदस्य असतील. वन विभागाचे प्रधान सचिव या समितीचे कार्याध्यक्ष असतील. जलसंपदा, जलसंधारण, कृषी, शालेय शिक्षण, नगरविकास-२, पर्यावरण, उद्योग, पशुसंवर्धन, मत्स्य व्यवसाय, पाणी पुरवठा व स्वच्छता या विभागाचे प्रधान सचिव या समितीमध्ये सदस्य असतील.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक, महाराष्ट्र जैवविविधता मंडळ, नागपूर, पुण्याचे प्रधान मुख्य वन संरक्षक, सांस्कृतिक कार्यचे सचिव आणि जल व भूमी व्यवस्थापन संस्था अर्थात वाल्मी या समितीत सदस्य असणार आहेत. याशिवाय या समितीमध्ये अशासकीय सदस्य असणार आहेत. डॉ. राजेंद्र सिंह विशेष निमंत्रित म्हणून असणार आहेत. डॉ. सुमंत पांडे, नरेंद्र चौघ, जयाजी पाईकराव, रमाकांत कुलकर्णी, डॉ. गुरूदास नुलकर, अनिकेत लौहिया, राजेश पंडित, महेंद्र महाजन या समितीचे सदस्य असणार आहेत, तर सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक



या समितीत सदस्य सचिव असतील. या समितीचा कार्यकाळ एक वर्ष अथवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत असेल. महाराष्ट्राला वारंवार भेडसावणार्‍या पूर आणि दुष्काळ या समस्यांपासून मुक्तीसाठी नदी संवाद अभियानाचे आयोजन करणे, अभियानांतर्गत जनसामान्यांना नदीसाक्षर करण्याबाबत उपाययोजना आखणे, त्याची अंमलबजावणी करणे, अमृत वाहिनी बनविण्यासाठी मसुदा तयार करणे, नदीचे स्वास्थ आणि मानवी आरोग्य याबाबत प्रचार व प्रसार रुपरेषा आखणे, नदीचा तट आणि प्रवाह जैवविविधतेबाबत प्रत्येक जिल्ह्यात प्रचार, प्रसार व नियोजन करणे, नदीच्या पाणलोट क्षेत्राचा अभ्यास करुन त्यावर संबंधितांना कार्यवाहीसाठी अहवाल सादर करणे, पावसाचे पाणी अडवून भूजल स्तर उंचावणे, अतिक्रमण तसेच शोषण आणि प्रदूषण या तीन कारणांचा अभ्यास आणि त्याचा नदी व मानवी जीवनावर होणार परिणाम अभ्यासणे, महाराष्ट्रातील सुमारे ७५ नदी खोर्‍यांतून नदी संवाद यात्रा आयोजित करण्याबाबत आराखडा तयार करणे, शासनाबरोबर समाज आणि नदीवर काम करणार्‍या संस्थांमध्ये सुसूत्रता आणणे, स्थानिक स्वराज्य संस्था यांचे जलव्यवस्थापन तपासणे अशी या समितीची ध्येय आणि उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

### नदी संवर्धनासाठी विविध विभागांची मदत घेण्यात येणार

या आगळ्यावेगळ्या उपक्रमाबाबत मंत्री मुनगंटीवार म्हणतात की, राज्यातील ७५ नद्यांचे संवर्धन करताना जलबिरादरी संस्थेच्या विशेष नैपुण्याची मदत घेतली जाणार आहे, तर राज्य शासनाचे जलसंपदा, जलसंधारण, वन इत्यादी विभाग यामध्ये जोडले जाणार आहेत. नदी संरक्षण आणि संवर्धनासाठी सांस्कृतिक कार्य विभाग काम करणार असून सांस्कृतिक कार्य विभागामार्फत महाराष्ट्रातील ७५ नद्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यातील एक नोडल अधिकार्‍याची नियुक्ती केली जाणार आहे. हे नोडल अधिकारी संबंधित नदीच्या विकासासाठी, पुनरुज्जीवनासाठी काम करतील. नदी यात्रेच्या माध्यमातून नद्यांचे आयुष्य चांगले कसे राहील, नदी ही अमृतवाहिनी कशी आहे, छोट्या नद्या पुनरुज्जीवित केल्या तर त्याचा कसा फायदा होईल या सर्वांची माहिती नदी यात्रेच्या दरम्यान देण्यात येणार आहे.

### नदी संवर्धन उपक्रमाला लोकसहभाग मिळणे गरजेचे

या वेळी राजेंद्र सिंह म्हणाले की, भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना महाराष्ट्रात नदी महोत्सव आयोजित करणे, तसेच ७५ नद्यांचे पुनरुज्जीवन केले जाणे ही बाब अत्यंत आनंदाची आहे. राज्य शासनाच्या या मोहिमेत जलबिरादरीचा पूर्ण पाठिंबा असून आपल्या सर्वांसाठी नद्यांचे प्रदूषण थांबविणे, त्यांचे संरक्षण आणि संवर्धन करणे याला महत्त्व असणार आहे.केवळ निधी देऊन नद्या स्वच्छ होणार नाहीत, तर यासाठी आपला नदीशी व्यवहार कसा आहे, आपले संस्कार काय आहेत आणि आपली आत्मदृष्टी यामध्ये परिवर्तन होणे आवश्यक आहे, तरच नदी स्वच्छ होईल. नदीला समजून घेताना नदीवर प्रेम करणे आवश्यक आहे. जसे नदी संवर्धन करण्यासाठी निधीचे नियोजन किंवा आराखडा आवश्यक आहे त्याचप्रमाणे नदी संवर्धन कामाला लोकसहभागाची जोड मिळायला हवी.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे २ ऑक्टोबरला वर्धा येथील कार्यक्रमात राज्यातील विविध ७५ नद्यांचे जलनायक सहभागी झाले होते तसेच जलबिरादरीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजेंद्र सिंह यांच्यासह जलबिरादरीचे सदिच्छादूत अभिनेते चिन्मय उद्गीरकर उपस्थित होते. विशेष म्हणजे या कार्यक्रमात या जलनायकांकडे जलकलश आणि आपला ध्वज सुपूर्द करण्यात आला.

भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. एपीजे कलाम यांच्या जयंती दिनी म्हणजेच १५ ऑक्टोबरला राज्यातील ७५ नद्यांवर एकाच दिवशी नदी यात्रेला सुरुवात होईल. या वेळी राज्यातील नदी अभ्यासक, नदीप्रेमी, शेतकरी, विद्यार्थी, महिला सहभागी होणार आहेत. प्रत्येक नदीच्या यात्रेवळी किमान १०० जण सहभागी होतील असा अंदाज असून २६ जानेवारी २०२३पर्यंत ही नदी यात्रा चालणार आहे. मुळातच नदी यात्रा किंवा नदी परिक्रमा आयोजित करण्यामागचा मुख्य उद्देश हा राज्यातील नद्यांच्या सद्यस्थितीत माहिती घेणे हा आहे. स्थानिक नागरिकांच्या लोकसहभागातून नदीचे आरोग्य चांगले राहावे, नदीचे संवर्धन व्हावे यासाठी नदी कशी स्वच्छ आणि संरक्षित ठेवणे आवश्यक आहे याची माहिती या वेळी देण्यात येईल.

पारंपरिक माहिती देत असताना आधुनिक विज्ञानाची जोड देऊन नदी संवर्धन आराखडा तयार करण्यात येणार असून त्या आराखड्याची राज्यभरात अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

**-वर्षा फडके-आंधळे, वरिष्ठ सहाय्यक संचालक (माहिती)**

# नवी मुंबईत डासांचा उपद्रव वाढला

## विविध आजार बळावण्याचा धोका

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

घणसोली गावात अनेक ठिकाणी गटारांची कामे अर्धवट अवस्थेतच आहेत; तर अनेक ठिकाणी गटारांची झाकणे तुटलेली, गायब झालेली आहेत. यामुळे नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असून मोठ्या प्रमाणात डासांचा उपद्रवदेखील वाढल्याने विविध आजार बळावण्याचा धोका आहे.

घणसोली विभागातील नागरिकांना विविध समस्यांना दररोज सामोरे जावे लागत आहे. अशातच अनेक विभागांत महापालिकेची अर्धवट असलेली गटारांची कामे नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. या गटारांमधून अनेकदा सांडपाणी रस्त्यावर येत आहे. तसेच काही ठिकाणी गटारांवरील झाकणे तुटलेली तर काही ठिकाणी अस्तित्वातच नसल्याने एखादा अपघात होण्याची शक्यता आहे. शिवाय या गटारांमुळे मोठ्या प्रमाणात परिसरात


(संग्रहीत छायाचित्र)

दुर्गंधी पसरली असून डासांचा उपद्रव वाढला आहे. त्यामुळे पालिकेने तातडीने याची दखल घेऊन गटारांवरील झाकणे बसवावीत, अशी मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

पावसात तुटलेल्या आणि नाहीशा झालेल्या झाकणांमुळे ही उघडी गटारे घातक ठरण्याचा धोका अधिक आहे.



अनेकदा शाळा सुटल्यानंतर मुले पावसाच्या जमलेल्या पाण्यातून चालतात. त्यात उघडी गटारे लक्षात न आल्याने त्यात पडून प्राणहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे एखाद्याचा मृत्यू झाल्यानंतर पालिकेचे अधिकारी जागे होणार आहे का, असा सवाल घणसोलीकर विचारात आहेत.

**अनेक दिवसांपासून घणसोली विभागातील गटारांची झाकणे तुटली आहेत. अशातच या रस्त्यांवर पावसाचे पाणी साचत असल्याने रस्ता आहे की खड्डा, हे लक्षात येत नाही. त्यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.**

**–किशोर पाटील, नागरिक**

# पिकअप टेम्पोची स्कूटीला धडक; चालकाचा मृत्यू, दोघे गंभीर जखमी

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

गव्हाणफाटा – चिरनेर रस्त्यावरुन बॉयलर कोंबड्या घेऊन जाणाऱ्या पिकअप टेम्पोची स्कूटी चालकाला जोरदार धडक बसल्याने झालेल्या अपघातात स्कूटीचालक वैभव म्हात्रे (रा. हाशिवरे –अलिबाग) याचा जागीच मृत्यू झाला आहे. तर टेम्पो चालक व त्याचा साथीदार गंभीर जखमी झाला आहे. अपघात रविवारी (दि. ९) सकाळी ६ : १५ च्या सुमारास टाकीगाव बसस्थानकाजवळ घडला.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या वृत्तानुसार, गव्हाण फाटा–चिरनेर रस्त्यावरून खारपाडा दिशेने बॉयलर कोंबड्या घेऊन जाणाऱ्या टेम्पोने चिरनेरच्या दिशेने येणाऱ्या स्कूटीचालकाला जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात स्कूटी चालक वैभव म्हात्रे या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. तर सदर टेम्पोचालक सलिम हुसेन व त्यांचा साथीदार अब्दुल शेख हे गंभीर जखमी झाले आहेत.

या अपघाताची माहिती घटनास्थळी उपस्थित असलेले पुनाडे गावचे रहिवाशी देवेंद्र पाटील यांनी उरण पोलिसांना फोनवरून माहिती दिली. उरण पोलिसांनी अपघातग्रस्तांना या परिसरातील



नागरिकांच्या मदतीने उरण येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले आहे. या अपघाताची माहिती उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक गायकवाड यांना मिळताच त्यांनी घटनास्थळी आपल्या कर्मचारी वर्गाला पाठवून वाहतूक कोंडीची समस्या उद्भवणार नाही याची खबरदारी घेतली.

अपघातासंदर्भात उरण पोलीस अधिक तपास करीत आहेत. पुनाडे गावातील देवेंद्र पाटील यांनी प्रसंगावधान राखत ही माहिती त्यांच्या कुटुंबीयांना व पोलिसांना कळविली. या दुर्घटनेबाबत सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# दिवाळीनिमित्त गडकिल्ले, रांगोळी स्पर्धा

**उरण : बातमीदार**

श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या माध्यमातून दिवाळी सणाचे औचित्य साधून गडकिल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. याही वर्षी गड किल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच खास महिला भगिनींसाठी रांगोळी स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे. दोन्ही स्पर्धा या उरण तालुका मर्यादित आहेत.

गड किल्ले स्पर्धेसाठी पहिला गट (वयोगट ३ ते ५), दुसरा गट (वयोगट ६ ते १२), तिसरा गट (वयोगट १३ ते २०), खुला गट (वयोगट २१ पासून पुढे) असे स्पर्धेसाठी गट आहेत. तर रांगोळीसाठी पहिला गट (वयोगट ६ ते ११), दुसरा गट (वयोगट १२ ते २१), तर तिसरा गट (वयोगट २२ ते पुढे) असे स्पर्धेसाठी वयोगट आहे. अशा गटात स्पर्धा होणार आहेत. गडकिल्लेचे फोटो व रांगोळी स्पर्धेचे फोटो स्पर्धकांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील ८०९७१०००७३, कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे ९७०२७५१०९८ या नंबर पाठवायचे आहेत.

स्पर्धेला रविवार (दि. १६) पासून सुरुवात होईल व स्पर्धेचा अंतिम दिनांक २६ ऑक्टोबर असेल. नाव नोंदणीचा अंतिम दिनांक १६ ऑक्टोबर आहे. १० ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता रँकर्स अकॅडमी, कोप्रोली चौक येथे बक्षीस वितरण करण्यात येईल.

### असे आहेत स्पर्धेचे नियम

***स्पर्धेसाठी नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. रांगोळी आणि गडकिल्ले स्पर्धा आप आपापल्या घरासमोरच होईल. स्पर्धकांनी गड किल्ले स्पर्धा व रांगोळी स्पर्धेचे फोटो आयोजकांनी दिलेल्या व्हाट्सअप नंबरवरच पाठवावे. फोटो पाठविताना संपूर्ण नाव, संपूर्ण पत्ता, मोबाइल नंबर पाठवावे. सदर स्पर्धा फक्त उरण तालुका मर्यादित आहे. स्पर्धेच्या बाबतीत किंवा बक्षीस वितरणाच्या बाबतीत अंतिम निर्णय पंच किंवा अध्यक्ष, कार्याध्यक्ष यांचा राहील.***

# वन्यजीव सप्ताहानिमित्त शाळेत, आदिवासी वाड्यांवर जनजागृती

**उरण : बातमीदार**

वन्यजीवांच्या संरक्षण, संवर्धनाकरिता १ ते ७ ऑक्टोबर या कालावधीत वन्यजीव सप्ताह साजरा केला जातो. याच निमित्ताने ठाणे वनविभाग, कर्नाळा पक्षी अभयारण्य, उरण वनविभाग आणि कर्जत पूर्व वनपरिक्षेत्र यांच्या संयुक्त विद्यमाने वन्यजीव सप्ताह निमित्त उरण–पनवेल, कर्जत तालुक्यातील शाळांत आणि विविध आदिवासी वाड्यांवरील आदिवासी बांधवामध्ये या जंगल संपत्तीबद्दल वन्यजीवांप्रति जनजागृती निर्माण करण्यात येत आहे.

या करिता एकूण सात दिवस वेगवेगळ्या सात आदिवासी वाड्यांवर आदिवासी बांधवांची आणि विद्यार्थी वर्गाची जनजागृती व्हावी व त्या माध्यमातून वन्यजीवांचे व जंगलाचे संरक्षण





आणि संवर्धन व्हावे या करिता राजू मुंबईकर यांच्या साप समज आणि गैरसमज व विविध प्राणी आणि पक्षी या बद्दलची उपयुक्त माहिती देणारे व्याख्यानरुपी प्रबोधनात्मक कार्यक्रमाद्वारे जनजागृती करण्यात आली. पहिल्या दिवशी पनवेल आपटा येथील प्राथमिक शाळेत, दुसऱ्या दिवशी पोसरी ठाकूरवाडी पनवेल येथे तर तिसऱ्या दिवशी अक्कुलवाडी येथील प्राथमिक शाळेत सर्व विद्यार्थीवर्ग आणि शिक्षकवृंद यांच्या उपस्थितीत तर चौथ्या दिवशी पी. पी. खारपाटील इंग्लिश मिडियम स्कूल चिरनेर येथे पाचव्या दिवशी जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल इंग्लिश मिडियम स्कूल वेश्वि येथील शाळेतील विद्यार्थी वर्गाच्या उपस्थितीत,सहाव्या दिवशी रानसई प्राथमिक शाळा, सातव्या दिवशी कर्जत पूर्व प्राथमिक शाळेत जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमादरम्यान प्रत्येक आदिवासी वाडीवरील लहान चिमुकल्यांना खास गोड खाऊचे वाटपसुद्धा करण्यात आले.

कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक वनपरीक्षेत्र अधिकारी एन.डी. राठोड, प्रदीप चव्हाण, व्ही.एम. म्हात्रे, एम.बी.इंगोले, एन.टी. भिषे, राजेंद्र पवार, शितल पाटील, सुप्रिया कसबे, वनपाल एस.एस.पवार, वनरक्षक तुकाराम जाधव, भुपेंद्र वारगे आणि अनिल आदींच्या उपस्थितीत वन्यजीव सप्ताहाचा कार्यक्रम झाला.

# टँकरमध्ये आढळलेल्या नागाची सुटका

**नवी मुंबई : बातमीदार**

एम. एम. व्हॅली स्पोर्ट ग्राउंड मुंब्रा या ठिकाणी भारतीय सैन्य दल भरती चालू आहे. ग्राउंड वरसैन्य भरतीसाठी आलेल्या जवानांना पाणी पिण्यासाठी एक टँकर उभा करण्यात आला होता. टी पाण्याच्या टँकरमध्ये जवानाला नाग आढळून आला. पुनर्वसु सर्प मित्र संस्थेच्या सदस्यांनी सुखरूप त्या नागाची सुटका केली.





या पाण्याच्या टँकरमध्ये एक जवान जेवून झाल्यावर आपली जेवणाची प्लेट धुण्यासाठी टँकरजवळ गेला. पाणी चालू करण्यासाठी जावनाने हात पुढे केला असता एक विचत्र भयानक फुत्कारण्याचा आवाज टँकरमधून आला. साप असल्याचा अंदाज बांधत जवानाने त्वरित आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यास कळवले. अधिकाऱ्यांमार्फत सदर माहिती फोन वरून पुनर्वसू फाउंडेशनला देण्यात आली.

ही माहिती संस्थेचे सर्पमित्र अक्षय वाघमारे यांना कळल्यावर ते त्वरित घटनास्थळी पोहचले. त्यांनी सुरक्षेची काळजी घेत बचाव कार्य सुरू केले. अथक परिश्रमानंतर साप पाडण्यात यश आले. सापाविषयी वनविभागास माहिती देऊन सापाला सुखरूपरित्या जंगलात सोडण्यात आले.

# रसायनीत निष्काळजीपणा बेतला तरुणाच्या जिवावर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

उंदीर मारण्यासाठी आणलेले औषध चुकून खाल्ले गेल्याने गणेश नगर मधील एका तरुणाला आपले प्राण गमवावे लागले. गणेशनगर रिस येथील कस्तूर बिल्डींगमध्ये राहणारा जिक्सन जर्वासीस (वय २९) याच्या घरात उंदीर भरपूर झाले होते.

उंदरांना मारण्यासाठी जिक्सनने रेटॉल पेस्ट क्रीम आणली होती. त्याने हे विषारी औषध टॉमेटोवर लावून टोमॅटो घरात दोन–तीन ठिकाणी ठेवून दिले. यानंतर त्याने हात न धुताच जेवण केले. हात न धुतल्याने हाताला लागलेले विषारी औषध जिक्सनच्या पोटात गेले. त्यामुळे जिक्सनला अस्वस्थ वाटून उलट्या होऊ लागल्या त्याला ताबडतोब नवी मुंबई येथील अपोलो हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले, परंतु त्याला मयत घोषित केले.

या प्रकरणी जिक्सनचा भाऊ ग्रेसेस याने रसायनी पोलीस ठाण्यात खबर दिली असता रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अश्वनाथ खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनी पोलीस ठाण्याचे सहाय्यक फौजदार नाथ लोखंडे आणि खाडे पाटील यांनी घटनास्थळी भेट दिली. या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात सीआरपीसी १७४ प्रमाणे गुन्हा नोंद झाला आहे.

# निराधारांना अन्नधान्याचे वाटप




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई येथील माँ सरोजा आचारी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने पनवेल नजीकच्या नेरे परिसरातील तीन सेवाभावी संस्थांना अन्न धान्याचे वाटप करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष अली हसन खान, सचिव देवी प्रसाद सिंग, आणि खजिनदार अशोक सिंग यांच्या शुभहस्ते अन्नधान्य जिन्नसाचे वाटप संपन्न झाले. या वेळी सिटी बेल वृत्तसमूहाचे समूह संपादक मंदार दोंदे आणि पत्रकार मयूर तांबडे उपस्थित होते.

नेरे विभागातील संचालिका संगीता नितीन जोशी यांचे स्नेहकुंज आधारगृह, प्रमोद पाटील संचालित वारलेश्वर आधार घर व वृद्धाश्रम आणि ललिता व मनोज कुरुळकर संचालित आदिवासी, कर्ण बधिर, मतिमंद निवासी विद्यालय या संस्थांना माँ सरोजा आचारी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने प्रत्येकी ३० किलो तांदूळ, पंधरा किलो तूर डाळ, पाच किलो मूग डाळ, पाच किलो चवळी, पाच किलो वाटाणा, दहा किलो साखर आणि तेलाचा डब्बा असे रेशन वाटप करण्यात आले.

# विसर्जित मूर्तींची माती पुन्हा मूर्तिकारांकडे!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींमुळे मोठ्या प्रमाणात जलप्रदूषण होते. यासाठीच पर्यावरणाच्या संतुलनासाठी इको फ्रेंडली गणेशोत्सव ही संकल्पना पुढे आली आहे. त्यानुसार शाडूच्या मातीच्या मूर्तींची निर्मिती करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. घरच्या पिंपात विसर्जन केलेल्या मूर्तीची माती पुन्हा मूर्तिकारांकडे सुपूर्द करून पनवेल वेस्ट वॉरियर्सने पर्यावरणपूरक उपक्रम हाती घेतला आहे.

पनवेल परिसरामध्ये गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हजारो घरगुती आणि सार्वजनिक गणपती बाप्पांची प्रतिष्ठापना केली जाते. यासाठी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना मागणी आहे. वास्तविक पाहता प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींचे विसर्जन करताना जलाशयाचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. मूर्तींना वेगळ्या प्रकारचे रासायनिक रंग दिल्याने पाण्यामधील जलचरांचा मृत्यूही होतो. पर्यावरणाचा बिघडणारा समतोल थांबवण्यासाठी इको फ्रेंडली गणेशोत्सव साजरा करावा, यासाठी पर्यावरणवादी संघटना आणि व्यक्ती; तसेच प्रदूषण नियंत्रण महामंडळ सातत्याने जनजागृती करत आहेत. त्यामुळे शाडूच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्याकडे कल वाढलेला आहे.


(संग्रहीत छायाचित्र)

पनवेल परिसरातही अशा प्रकारे पर्यावरणपूरक बाप्पा अनेक घरांमध्ये विराजमान झाले होते. दीड, सात आणि दहा दिवसांच्या बाप्पाचे घरच्या घरीच विसर्जन करण्यात आले. शाडूची माती विरघळल्यानंतर पनवेल वॉरियर्सने ती जमा करून मूर्तिकारांकडे सुपूर्द केली. या माध्यमातून शून्य प्रदूषणाचा अभूतपूर्व उपक्रम खारघर, कामोठे, सुकापूर, पनवेल, नवीन पनवेल व करंजाडे येथे राबवला. यामध्ये प्राजक्ता शहा, घनश्याम पाटील, गौरी काशीकर, प्रल्हाद बोडके, तनय दीक्षित, विनोद शिंगण व वृषाली म्हात्रे यांनी कृतीतून जनजागृतीची मुहूर्तमेढ रोवली. मूर्तिकारांचा आर्थिक फायदा, पर्यावरण संरक्षण व मूर्तीच्या मातीतून परत देवाच्या मूर्ती घडून पवित्र व आध्यात्मिक लाभ अशी त्रिसूत्री असलेला कार्यक्रम गणेश शिंदे, प्रतीक्षा महाडिक, राजीव अधिकारी व तुषार लेले यांनी भक्तिभावाने पार पाडला.

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती पाण्यात लवकर न विरघळल्याने, मूर्तीचे अवयव भंगतात. त्याचे तुकडे नैसर्गिक प्रवाहात अडथळे आणून पाणी साचून राहते. त्याचबरोबर जलस्रोतांची गढूळता, उष्णता व क्षारता वाढते. पाण्यातील ऑक्सिजन कमी होतो. प्रकाश कमी मिळाल्याने प्रकाश संश्लेषणात अडथळे येतात. मूर्तींच्या सिंथेटिक रंगातील जड व विषारी धातू पाणवनस्पती व माशांमधून अन्नसाखळीत प्रवेश करतात. विसर्जनानंतर कृत्रिम तलावातून काढलेले डेब्रिज हेदेखील प्रचंड मृदा प्रदूषण करते.

**पनवेल वेस्ट वॉरियर्सनी या परिस्थितीचा अभ्यास केला. काळाची गरज ओळखून घरच्याघरी मूर्ती विसर्जनानंतर राहिलेली मातीत मूर्तिकारांना भेट देऊन अनेक दुष्परिणाम थांबवण्याचा पायंडा पाडला. सार्वजनिक ठिकाणी गर्दी व वाहतूक कोंडी न करता, शून्य डेब्रिज, शून्य प्रदूषण व शून्य खर्चाचा हा उपक्रम लवकरच सर्वत्र करण्याचा मानस आहे.**

**–प्राजक्ता शाह, पनवेल वेस्ट वॉरियर्स**

# विद्यार्थ्यांनी बनवले विद्युत वाहन चार्जिंग केंद्र

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील एनएमआयएमएसच्या कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या प्रियेश जोशी आणि हर्ष या दोन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी झिरोव्हॉल्ट विद्युत वाहन चार्जिंग केंद्र आणि सॉफ्टवेअर बनवले आहे.

विद्युत वाहनांचे युग सुरू झाले असताना, विद्युत वाहन चार्जिंग केंद्राचा मोठ्या प्रमाणावर अवलंब करण्यासाठी सर्वांत मोठा अडथळा म्हणजे चार्जिंग पायाभूत सुविधांचा अभाव आहे. भारतातील ईव्ही चार्जिंग उद्योगाची पूर्तता करण्यासाठी एक कार्यक्षम, शाश्वत आणि परवडणारे उपाय तयार करण्याचे ध्येय त्यांनी उराशी बाळगून हे कल्पकेतेतून चार्जरचे सुरळीत व्यवस्थापन आणि ऑपरेशनसाठी सॉफ्टवेअर (चार्जिंग स्टेशन मॅनेजमेंट सिस्टम) विकसित केले आहे.




देशात आता मोठ्या प्रमाणात विद्युत वाहनांची विक्री सुरू झाली आहे, मात्र अजूनही विद्युत वाहनं चार्ज करण्यासाठी चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर भारतात पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही. झिरोव्हॉल्ट चार्जिंग केंद्राच्या माध्यमातुन वेगवान वाहन चार्जिंग करता येईल असा दावा प्रियेश यानी केला आहे. तसेच स्मार्ट मोबाइल ॲपप्लिकेशन विद्युत वाहन चालकांना त्यांचे वाहन शोधण्यात आणि वेळेत चार्ज करण्यास मदत करेल. चार्जिंग कमी वेळेत लवकर चार्जिंग होणार आहे. एक तासाऐवजी पाच ते पंधरा मिनीटांत चार्जींग होते. सर्व गाड्यांसाठी एकच चार्जर, डीसी असल्यामुळे चार्जींग जलद होते, कमी जागा लागत असल्याने शैक्षणिक संस्था, रहिवासी इमारती, व्यावसायिक संकूले, पेट्रोल पंप, हायवेवरील छोटे– मोठे व्यापारी हे चार्जींग स्टेशन लावू शकतात. याद्वारे अर्थार्जनही करू शकतात.

मुंबईत बृहन्मुंबई इलेक्ट्रिसिटी सप्लाय ॲण्ड ट्रान्सपोर्ट अंडरटेकिंग (बेस्ट) आणि चलो मोबिलिटी प्रायव्हेट लिमिटेड यांच्या भागीदारीत भारतातील सर्वात वेगवान तीन विद्युत वाहन चार्जिंग केंद्र स्थापन करण्याची यशस्वी कामगिरी केली आहे.

# पाताळगंगा नदीचे वाढते प्रदूषण चिंतेची बाब

**खोपोली : जयंत माडपे**

पाताळगंगा नदी रायगड जिल्ह्यातील प्रमुख नदी आहे. खोपोलीतील उगमापासून पुढे समुद्रापर्यंत या नदीकाठावरील शेकडो गावे व येथील औद्योगिक क्षेत्रासाठी ही नदी भाग्यरेषा आहे. दीड लाखाच्या घरात लोकसंख्या असलेले खोपोली शहर तर पिण्याच्या पाण्यापासून दैनंदिन पाण्यासाठी फक्त पाताळगंगा नदीवर अवलंबून आहे. दुसरीकडे दिवसेंदिवस या नदीचे प्रदूषण वाढत असून नदीतील जलचर प्राणी व नागरिकांचे आरोग्य धोक्यात टाकण्याचे दुष्कर्म सुरू आहे.



अनेक वेळा नदीतपात्रात मोठ्या प्रमाणावर मासे मृत होण्याच्या घटना समोर येत असून अचानक नदीतील पाण्याचा रंग बदलत असल्याचेही दिसत आहे. अशा स्थितीत भाग्यरेषा असलेल्या पवित्र पाताळगंगा नदीचे प्रदूषण रोखण्याची जबाबदारी सर्वांवर येऊन ठेपली आहे. मागील दोन दिवस खोपोली शीळफाटापासून सावरोली पूल या नदीपात्राच्या चार किमी अंतरात मोठ्या प्रमाणावर मासे मृत होत आहेत. याची दखल घेत तहसीलदार आयुब तांबोळी यांनी रायगड जिल्हा प्रदूषण नियंत्रण विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना पाचारण करून तपासणी करून योग्य कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार प्रदूषण नियंत्रण विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी करून तपासणीसाठी पाण्याचे नमुने घेतले आहेत. या बाबतीत तातडीने अहवाल देण्यास सांगण्यात आले आहे.

पाताळगंगा नदीचे प्रदूषण वाढण्याची कारणे अनेक आहेत. यातील प्रमुख म्हणजे येथील औद्योगिक क्षेत्रातील अनेक कंपन्यातून छुप्या मार्गाने दररोज मोठ्या प्रमाणात रसायनमिश्रीत सांडपाणी नदीत सोडत आहेत. खोपोली शहरातील हजारो लिटर सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न होता थेट नदीत सोडले जात आहे. ॲसिड व घातक रसायन वाहून नेणारे टँकर खुलेआम नदीकाठी उभे करून धुतले जात आहेत तसेच मासेमारीसाठी रसायन नदीच्या प्रवाहात टाकण्याचे प्रकारही वारंवार घडत आहेत. एका बाजूला पाताळगंगा नदी प्रदूषित करण्यासाठी अनेक मार्गाने प्रयत्न केले जात असताना प्रदूषण नियंत्रण विभागाचे अधिकारी मात्र एखादी घटना समोर आल्यावर वेळकाढू धोरण अवलंबित आहेत. मुख्य म्हणजे तपासलेल्या नमुन्याच्या अहवालात प्रदूषण करण्यात जबाबदार कोण व त्यानुसार कारवाईबाबत प्रक्रिया पूर्णत्वास जात नसल्याने पाताळगंगा नदीचे प्रदूषण कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढतच आहे.

**नदीपात्रात मासे मृत्यू होण्याच्या घटनेची गांभीर्याने दखल घेतली आहे. प्रदूषण नियंत्रण विभागाच्या अधिकाऱ्यांना नमुने तपासणी व सविस्तर तपासणी करण्याच्या सूचना दिल्या असून तातडीने अहवाल देण्याचे सांगण्यात आले आहे.**

**–आयुब तांबोळी,**
**तहसीलदार खालापूर**

**खोपोलीतील निघणाऱ्या सांडपाण्याचे नियोजन योजनेला अंतिम मंजुरी प्राप्त झाली आहे. आवश्यक निधीही मंजूर करण्यात आला आहे. यात संपूर्ण शहरात भुयारी गटार योजना, सांडपाणी एकत्रीकरण, सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांट उभारून त्याद्वारे प्रक्रिया करून या पाण्याचे शुद्धीकरण करण्यात येणार आहे. लवकरच ही योजना पूर्णत्वास येईल .**

**–अनुप दुरे-पाटील,**
**मुख्याधिकारी, खोपोली**


## परतीच्या जोरदार पावसाने शेतकरी हवालदिल

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे विभागातील वरवठणे, पाटणसई, चिकणी, कोंडगाव, वासगाव, पळस येथील शेतकऱ्यांना परतीच्या पावसाचा फटका बसला आहे. नवरात्रोत्सवात उसंत देणाऱ्या पावसाने त्यानंतर जोरदार हजेरी लावल्याने नागोठणे विभागातील शेतकरी हवालदिल झाले आहेत.

या पावसामुळे निर्माण झालेल्या गारव्याने उष्णतेमुळे हैराण झालेल्यांना उकाडा कमी होऊन दिलासा मिळाला आहे. वातावरणात सध्या थंडावा निर्माण होत आहे, मात्र सामान्य शेतकऱ्यांना सरत्या पावसाचा फटका बसत असून हातातोंडाशी आलेल्या शेतातील भातपिकाचे नुकसान होत आहे.

याशिवाय काही उंच जमीन असलेल्या भातशेतीत चिऱ्या कोलम, हलवा व अन्य लवकर होणारी भातपिकांचीही नासाडी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. येथील शेतकरी पीक नुकसानीच्या संकटात सापडला आहे. हा परतीचा पाऊस अजून किती दिवस कोसळणार याचा अंदाज येत नसल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे.



# लायन्स क्लब कोलाड-रोहाची सामाजिक बांधिलकी

## शाळेतील विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी

**रोहे : प्रतिनिधी**

लायन्स क्लब कोलाड–रोहा यांच्या सामाजिक बांधिलकीतून नुकतेच रोहा तालुक्यातील रा. जि. प. प्राथमिक शाळा पुगाव येथील विद्यार्थ्यांची कोलाड येथील जनरल सर्जन डॉ. विनोद गांधी यांच्या डॉ. गांधी नर्सिंग होममध्ये आणि दंतचिकित्सा तज्ज्ञ डॉ. तनुजा पवार यांनी पुगाव येथील विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी व उपचार केले. यापाठोपाठ राजिप शाळा गोवे येथे विद्यार्थ्यांसाठी डॉ. विनोद गांधी यांनी विद्यार्थीवर्गाची आरोग्य तपासणी करून त्यांना मोफत औषधोपचार दिले.

लायन्स क्लब कोलाड–रोहा यांनी ऑक्टोबर हा सर्व्हिस विक म्हणून या कालावधीत विविध प्रकारचे उपक्रम राबवित सामाजिक क्लबचे अध्यक्ष डॉ. सागर सानप, उपाध्यक्ष नरेश बिरगावले, सचिव रवींद्र लोखंडे, खजिनदार डॉ. श्यामभाऊ लोखंडे, व सर्व सदस्य यांच्या माध्यमातून आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी कोलाड–रोहा लायन्स क्लबचे सदस्य डॉ. गांधी यांनी राजिप प्राथमिक शाळा गोवे येथील इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या एकूण ३५ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली, तर पुगाव शाळेतील ४७ विद्यार्थ्यांची दंत तपासणी डॉ. तनुजा पवार यांनी केली. या उपक्रमावेळी खांब विभागातील शिक्षणप्रेमी तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नारायण धनवी, पुगाव शाळेच्या शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष नीलम कलमकर, संजना शिंदे, येळकर, देशमुख मॅडम, अंगणवाडी सेविका व पालक तसेच केंद्र प्रमुख रत्नाकर कनोजे, मुख्याध्यापक निवास थळे, गोवे येथे माजी सरपंच तथा सदस्य नरेंद्र पवार, माजी उपसरपंच तथा सदस्य नितीन जाधव, माजी उपसरपंच संदीप जाधव, सदस्य रंजिता जाधव, गाव कमिटी अध्यक्ष नामदेव जाधव, युवक महेंद्र जाधव, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष पांडुरंग जाधव, सदस्य निलेश वाफिलकर, सुचिता शिर्के, पायल जाधव, मुख्यरध्यापक जयेश महाडिक, शिक्षिका गांधारे, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

पुगाव येथे नारायण धनवी यांनी मनोगात सांगितले की, गेली वर्षभर नाविन्यपूर्ण आपल्या ग्रामीण भागात सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रात करणारा कोलाड लायन्स क्लब विविध उपक्रम राबवितात. डोळ्यांची मोफत शिबिर घेत त्या रुग्णांची उत्तम मोतीबिंदू शस्त्रक्रिया केली आहे. असे चांगले काम ही संस्था करीत आहे, तर डॉ. तनुजा पवार यांनी मुलांच्या दातांची काळजी कोणत्या प्रकारे घेता येईल तसेच टूथब्रश करताना योग्य काळजी घेणे गरजेचे आहे, असे मौलिक मार्गदर्शन विद्यार्थी व पालकांना केले. गोवे येथे डॉ. गांधी व उपस्थित मान्यवर यांनी मार्गदर्शन केले.

आभार व्यक्त करताना शाळेचे मुख्याध्यापक जयेश महाडिक यांनी सांगितले की, कोलाड रोहा लायन्स क्लब संस्था परिसरात नेत्र तपासणी, आरोग्य तपासणी, शैक्षणिक साहित्यवाटप, गरजू व निराधार यांना धान्यवाटप, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, असे उपक्रम राबवित आहे. त्यांनी एका महिन्यापूर्वी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले व आज पहिली ते चौथीपर्यंत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. शेवटी लायन्स क्लब कोलाड रोहा पदाधिकारी व सदस्य तसेच उपस्थित मान्यवरांचे आभार मानण्यात आले.



(छाया : महादेव सरसंबे)

## महाड भिवघरमध्ये सेंद्रिय शेतीला पसंती

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील भिवघर गावातील किशोर पवार यांनी शेतातील खतांचा व कीटकनाशकांचा वापर थांबवून सेंद्रिय शेतीचा यशस्वी प्रयोग केला आहे. त्यांच्यापासून प्रेरणा घेत गावातील इतरही शेतकऱ्यांनी विषमुक्त शेतीकडे वाटचाल सुरू केली आहे.

शेतीचे उत्पन्न वाढावे यासाठी अनेक जण खतांचा तसेच कीटकनाशकांचा अतिवापर करतात. त्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढत असले तरी असे धान्य सेवन आरोग्याची हानी करते. त्यामुळे कर्करोगासारखे गंभीर आजार बळावत असल्याचे अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. याला पर्याय म्हणून विषयुक्त शेतीला काही शेतकऱ्यांनी प्राधान्य दिले आहे. भिवघर येथील किशोर पवार यांनी सात वर्षांपासून विषमुक्त शेतीला सुरुवात केली. पवार वनप्रेमी संघटनेचे अध्यक्ष असून गाव वणवामुक्त करण्यासाठी व येथील जंगल वाचविण्यात त्यांचे मोठे योगदान आहे.

गेल्या काही वर्षांपासून पवार आपल्या शेतामध्ये केवळ शेणखताचा वापर करीत आहेत. सुरुवातीच्या काळात त्यांना भाताचे पन्नास टक्क्यांपेक्षा कमी उत्पादन आले. भातशेती करताना सुरुवातीला तरवे भाजले जातात. त्याशिवाय भाताची रोपे येत नाहीत असे म्हटले जाते. किशोर यांनी शेणखत व लेंडीखत वापरून तरवे पेरले व भात रोपे आली, मात्र इतर खतांच्या रोपाप्रमाणे यांची वाढ नव्हती. खताची मात्रा कमी पडल्याने रोपे पिवळी पडली आणि भाताच्या लोंब्याही कमी आल्या, परंतु पर्यावरणाच्या रक्षणासाठी धडपडणारे पवार यांनी माघार घेतली नाही. त्यांनी नुकसान सोसत हा प्रयोग सुरूच ठेवला. आता त्यांच्या परिश्रमांना यश येत आहे. त्यांना भाताचे उत्पन्न मिळू लागले आहे. या वर्षीही पवार यांनी सुमारे एक एकर क्षेत्रामध्ये भातपिकाची लागवड केली आहे.

सेंद्रिय शेतीपासून निर्माण उत्पादनाला सध्या चांगली मागणी आहे. शहरात सेंद्रिय तांदूळ चांगल्या किमतीला विकला जातो. यासाठी संयम व कष्टाची तयारी पाहिजे, असे किशोर पवार यांनी सांगितले. रासायनिक खते व कीटकनाशके यांचा वापर न करता चांगले उत्पन्न घेता येते हे पाहून श्याम गायकवाड, सुरेश कळंबे यांच्यासह गावातील बहुतांश शेतकरी विषमुक्त शेतीकडे वळले आहेत. केवळ भातशेतीच नाही तर आंबा, काजू लागवड व भाजीपालाही त्यांनी विषमुक्त केला आहे. याचा दुसरा फायदा म्हणजे भिवघर परिसरात जैवविविधता वाढली आहे.

## देशाच्या प्रगतीत स्वयंसेवकांचा मोलाचा वाटा –मिलिंद कोशे

**खोपोली : प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेपासून आजपर्यंत संघाचा स्वयंसेवक प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष समाजाच्या तळागाळात जाऊन सेवाकार्य करीत आहे. याची अनुभूती समाजानेही घेतली आहे. कुठलीही अपेक्षा न बाळगता निस्वार्थी भावनेने स्वयंसेवक आपले कर्तव्य समजून समाजात काम करीत आहेत, असे प्रतिपादन कुलाबा जिल्हा धर्म जागरण प्रमुख मिलिंद कोशे यांनी खोपोली येथे केले.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघ खालापूर तालुक्याच्या वतीने बारा ज्योतिर्लिंग मंदिरात आयोजित विजयादशमी उत्सवात प्रमुख वक्ते म्हणून कोशे बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक शैलेश विठ्ठलानी व तालुका कार्यवाह अविनाश मोरे उपस्थित होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ फक्त सेवाकार्यासाठीच मर्यादेत न राहता समाजातील सुप्त सज्ञनशक्ती जागरणाचेही काम अविरतपणे करीत आहे. ९७ वर्षांच्या प्रवासात अनेक प्रतिकूल आव्हानांचा सामना संघाने केला आहे व यापुढेही देशाची एकता, अखंडता, व बंधूता अबाधित ठेवण्यासाठी समाजाला सोबत घेऊन संघाचे कार्यकर्ते कटिबद्ध असतील, असे कोशे यांनी सांगितले. कोशे यांनी केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाचा स्वयंसेवकांनी लाभ घेतला.

या वेळी संघ परंपरेनुसार प्रथम ध्वजारोहण व ध्वज प्रणाम करण्यात आले. त्यानंतर सांघिक पद्य व अमृत वचन स्वयंसेवकांनी सादर केले. शेवटी संघ परंपरेनुसार प्रार्थना झाल्यानंतर उत्सवाची सांगता झाली.

# माथेरानमध्ये ई-रिक्षा काळाची गरज!

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाला दिलेल्या निर्देशानुसार थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या माथेरानमध्ये २६ जुलै रोजी ई–रिक्षा सुरू करण्याबाबत चाचणी घेण्यात आली. त्यास समस्त नागरिकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला, मात्र काही मंडळींचा विरोध आणि प्रशासकीय उदासिनता यामुळे ही सेवा अद्याप सुरू होऊ शकलेली नाही. येथील पर्यटन व्यवसाय आणि स्थानिकांची मागणी लक्षात घेता ई–रिक्षा काळाची गरज आहे.



माथेरानचा शोध तत्कालीन ठाण्याचे कलेक्टर ह्युज मॅलेट यांनी १८५०मध्ये लावल्यानंतर पूर्वापार चालत आलेले व्यवसाय आजही कार्यरत आहेत. यामध्ये माणसाने माणसाला ओढून न्यावयाची हातरिक्षा ही प्रथा अमानवीय आहे. आजवर येथील काही गरीब श्रमिकांनी आपल्या कुटुंबाला आधार देण्यासाठी अन्य व्यवसायाचे साधन नसल्यामुळे जवळपास चार पिढ्या हा व्यवसाय केला आहे. जगात कुठेही अशा प्रकारची प्रथा सध्या कार्यान्वित नाही. अन्य ठिकाणी असणाऱ्या अशा प्रकारच्या हातरिक्षा केव्हाच कालबाह्य झालेल्या आहेत. फक्त माथेरानमध्ये ब्रिटिश कायद्यानुसार पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि विशेष म्हणजे इथे पूर्वीपासून कोणत्याही प्रकारच्या मोटर वाहनांना बंदी असल्यामुळे घोडा आणि हातरिक्षा हीच प्रमुख वाहने आहेत. काही वर्षांपूर्वी येथे रुग्णवाहिकेला परवानगी देण्यात आलेली आहे.

हातरिक्षा ओढणारे अनेक श्रमिक या अतिशय कष्टदायक कामामुळे व्यसनाच्या अधीन जाऊन स्वर्गवासी झालेले आहेत. त्यामुळे या व्यवसायात भावी पिढी शिरकाव करू शकत नाही. हातरिक्षा ओढणे म्हणजे गुलामगिरीचे लक्षण समजले जाते. त्यामुळे या व्यवसायात सहसा कोणी तरुण मुले सहभाग घेत नाहीत. अशा या हातरिक्षाचालकांना गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी त्यांना पर्यायी साधन उपलब्ध व्हावे, जेणेकरून ते पुढील जीवन आरामदायी आणि सुखकारक जगू शकतील, त्यांची भावी पिढीसुद्धा आपले जीवन सन्मानाने जगेल आणि माथेरानच्या पर्यावरणाचा समतोलदेखील ढळणार नाही अशा स्वरूपाच्या बॅटरीवर चालणाऱ्या ई–रिक्षांना परवानगी मिळाल्यास माथेरानमध्ये पर्यटन क्रांती होईल.

ई–रिक्षाच्या माध्यमातून माथेरानचे पर्यटन वाढावे, याच पर्यटनाच्या आधारे रोजगार निर्मिती व्हावी आणि यातूनच सर्वांच्या व्यवसायात भर पडावी या उदात्त हेतूने मागील दहा वर्षांपासून स्थानिक निवृत्त शिक्षक व सामाजिक कार्यकर्ते सुनील रामचंद्र शिंदे यांनी ई–रिक्षा सुरू व्हावी यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करून हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात समाविष्ट करण्यासाठी याचिका दाखल केली होती. इथल्या भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाला माथेरानमध्ये ई–रिक्षा सुरू करण्याबाबत निर्देश दिले.

यानुसार २६ जुलै रोजी इथे पहिल्यांदा ही रिक्षाची चाचणी घेण्यात आली. त्यास समस्त नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. या पहिल्याच ई–रिक्षाच्या चाचणीमुळे माथेरानकर सुखावले. शालेय विद्यार्थ्यांनी या अत्यावश्यक उपक्रमाचे जोरदार स्वागत केले. ज्येष्ठांना तर अत्यानंद झाला होता की आपण हे स्वप्न तर पाहत नाही ना. एवढ्या वर्षांनंतर त्यांनाही सन्मानाने अत्यंत स्वस्त दरात प्रवासाची सुविधा उपलब्ध होण्याची संधी मिळणार आहे. अपंग नागरिक, वयस्कर पर्यटकांसाठी ई–रिक्षांची सेवा म्हणजे पर्वणी ठरणार आहे. त्याचप्रमाणे आगामी काळात पर्यटकांच्या संख्येत मोठ्या संख्येने वाढ होऊन सर्वांनाच रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत.

विकासात्मकदृष्टचा शापित माथेरान हे पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असल्याने येथे प्रत्येक गोष्टीची परवानगी मिळविण्यासाठी अनेक अडथळे आलेले आहेत, तर प्रस्थापित पक्षांनी मतांच्या वोट बँकेसाठी नेहमीच विकासकामात खो घातलेला आहे. याची अनेक उदाहरणे स्थानिकांना ज्ञात आहेत. कर्जत ते माथेरानदरम्यान शासनाची मिनीबस सेवा सुरू व्हावी यासाठी सुरुवातीलाच खासगी वाहनचालकांनी आपल्या व्यवसायावर मिनीबसमुळे परिणाम होईल या भितीने ठाम विरोधाची भूमिका घेतली होती. अखेर स्थानिकांच्या रेट्यामुळे चार दशकांपूर्वीचे मिनीबसचे स्वप्न साकार केले होते. यानंतर अमन लॉज ते माथेरान रेल्वेस्थानक ही रेल्वेची शटल सेवा सुरू करावी यासाठी प्रयत्न सुरू झाले. तेव्हाही आमच्या व्यवसायावर परिणाम होईल म्हणून हातरिक्षाचालक आणि घोडेवाले यांचा विरोध राहिला होता, परंतु जेव्हा ही शटलसेवा सुरू झाली आहे तेव्हापासून ते आजतागायत पर्यटकांच्या संख्येत वाढ होऊन सर्वांनाच उत्तम प्रकारे रोजगार निर्मिती झाली आहे. विरोध हा काही काळ सुरू असतो, परंतु ज्या वेळी यातून मार्ग निघतो तेव्हा विरोध करणारेसुद्धा शांत राहतात आणि होणाऱ्या परिवर्तनाचा स्वीकार करतात. मुख्य रस्त्याच्या बाबतीतसुद्धा अशाच प्रकारे राजकीय पक्षांच्या मंडळींनी काही लोकांना हाताशी धरून तुमचे घोडे पेव्हर ब्लॉक वरून घसरून पडतील अशी भीती दाखवून संपूर्ण मुख्य रस्ता पेव्हर ब्लॉकचा करण्यास प्रखर विरोध दर्शविला होता. त्यामुळे नाईलाजाने रस्त्याच्या मधोमध घोड्यांना चालण्यासाठी सहा फुटांचा रस्ता सोडला होता, परंतु सद्यस्थितीत परिस्थिती उलट दिसत आहे. सर्व घोडे हे आरामात पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यावरून चालतात आणि पादचाऱ्यांना पावसाळ्यात मधल्या चिखलाच्या रस्त्यातून मार्गक्रमण करावे लागत आहे.

सर्वांत मोठा महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून ज्याकडे पाहिले जात होते तो पनवेल–धोदाणीमार्गे माथेरान या फिनिक्युलर रेल्वे प्रकल्पालासुद्धा विरोध केल्यामुळे आजही प्रलंबित आहे. आताही सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाने ई–रिक्षा सुरू करण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर चाचणी घेण्यात आली आहे. त्यालासुद्धा काही राजकीय विघ्नसंतोषी मंडळी स्वतःला श्रेय मिळणार नाही याच हेतूने काही व्यावसायिकांना हाताशी धरून खतपाणी घालून व्यत्यय आणण्यासाठी अग्रस्थानी असलेले पहावयास मिळत आहेत. अशा बालिश बुद्धीच्या लोकांमुळे माथेरानच्या विकासाची गाडी आजतागायत संथ गतीने मार्गक्रमण करीत आहे, पण आता लोकांना सारेकाही समजू लागले असून ते एकजुटीने उभे राहू लागले आहेत. त्याचा प्रत्यय नुकताच आला. ई–रिक्षासाठी समस्त माथेरानकरांनी नगर परिषदेवर मोर्चा नेऊन लक्ष वेधले. त्यानंतर प्रशासनाकडून १५ ऑक्टोबरपूर्वी कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

# मल्लखांबमध्ये महाराष्ट्राला सुवर्णपदक

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींनी मल्लखांब स्पर्धा प्रकारात पुरलेल्या आणि दोरीवरच्या मल्लखांब अशा दोन्ही प्रकारांत सुवर्णयश मिळविले. त्याचप्रमाणे योगासन प्रकारात महाराष्ट्राने दोन दिवसांत

## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा

पाच पदकांची कमाई करून आपले वर्चस्व राखले. वैभव श्रीरामेने सलग दुसऱ्या सुवर्णपदकाची, तर छकुली सेलोकरने रौप्यपदकाची कमाई केली. या दोघांनी शुक्रवारीही सुवर्ण व रौप्य यश मिळविले होते. पूर्वाने कांस्यपदक जिंकले.

मल्लखांब प्रकारात पुरलेल्या आणि दोरीवरच्या मल्लखांब प्रकारात सुवर्णपदक मिळविणाऱ्या महाराष्ट्राच्या मुलींच्या संघात रूपाली गंगावणे, जान्हवी जाधव, श्रुती उत्तेकर, नेहा क्षीरसागर, आकांक्षा बर्गे व पलक चुरी यांचा समावेश होता.



योगासन स्पर्धा प्रकारात वैभव श्रीरामे (१३६.५२ गुण) आणि छकुली सेलोकर (१२७.६८ गुण) यांनी सर्वोत्तम कामगिरी करताना महाराष्ट्राच्या पदकसंख्येत वाढ केली. वैभवने योगासनाच्या आर्टिस्टिक वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक पटकाविले. नागपूरचीच छकुली महिलांच्या आर्टिस्टिक वैयक्तिक गटामध्ये रौप्यपदकाची मानकरी ठरली. या प्रकारात रत्नागिरीच्या पूर्वाने (१२६.६८) कांस्यपदक मिळवले.

वुशू स्पर्धेत महाराष्ट्राच्या श्रावणी कटकेने कांस्यपदक मिळविले. ज्युडोमध्ये ५२ किलोखालील गटात स्नेहल खावरेने कांस्यपदक प्राप्त केले. पदकाच्या शर्यतीतून बाहेर पडल्यावर स्नेहलला रेपिचेजमधून पदकाची संधी निर्माण झाली. या लढतीत तिने मध्ये प्रदेशाच्या निधी यादवला पराभूत केले. त्यानंतर कांस्यपदकाच्या लढतीत राजस्थानच्या टीना शर्माला हरविले.

मल्लखांब प्रकारात पुरुष विभागात महाराष्ट्राच्या पुरुष संघाला अखेर रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. महाराष्ट्राच्या संघात अक्षय सरळ, शुभंकर खवले, आदित्य पाटील, दीपक शिंदे, सागर राणे व कृष्णा आंबेकर यांचा समावेश होता. सॉफ्टबॉल प्रकारात पुरुष संघाने विजयी सलामी देताना मध्य प्रदेशवर ९-० असा विजय मिळविला. हॉकीमध्ये युवराज वाल्मिकीच्या दोन गोलच्या जोरावर महाराष्ट्राने झारखंडला ३-१ असे नमवले.

# स्पेनच्या महिला फुटबॉल संघाकडून नवी मुंबईतील मैदानाची प्रशंसा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत होणाऱ्या १७ वर्षांखालील महिला फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील सामन्यांसाठी आलेल्या संघांपैकी स्पेनच्या फुटबॉल संघाने महापालिकेने आंतरराष्ट्रीय दर्जानुसार विकसित केलेल्या नेरूळ येथील यशवंतराव चव्हाण क्रीडांगणातील फुटबॉल मैदानावर सराव केला. या वेळी त्यांनी येथील व्यवस्थेची प्रशंसा केली.

भारतात ११ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत १७ वर्षांखालील महिला फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धा होत असून यातील पाच सामने नवी मुंबईतील डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियममध्ये १२, १५, १८, २१ व ३० ऑक्टोबर रोजी होणार आहेत. या अनुषंगाने स्पेन संघ नवी मुंबईत दाखल झाला. रात्रीपासून पाऊस असल्याने सराव मैदानांची पाहणी करून स्पेन संघाच्या प्रशिक्षकांनी नवी मुंबई महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण क्रीडांगणावर पाणी निचरा होण्याची चांगली व्यवस्था असल्याने सरावासाठी याच मैदानाची निवड केली.



या ठिकाणी पाऊस पडत असतानाही फुटबॉल मैदान अतिशय उत्तम स्थितीत असल्याने तसेच नियोजनबद्ध व्यवस्था व आखणी करून ठेवलेली असल्याने स्पेनच्या प्रशिक्षकांनी मैदानाची पाहणी केली आणि मैदानाच्या स्थितीबद्दल समाधान व्यक्त केले व त्यांच्या नियोजित वेळेनुसार सराव केला. महापालिकेच्या वतीने स्पेनच्या संघाला सामन्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# रसायनीत तरुणांमध्ये चढला क्रिकेटचा फिव्हर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा परिसरातील ग्रामीण भागात या वर्षाच्या मोसमातील खेळाला सुरुवात अनेक संघांकडून झाल्याचे पहावयास मिळाले.

रसायनी पाताळगंगा परिसराची महत्त्वाची बाजारपेठ असलेल्या मोहोपाडा शहरातील तरुणांनी त्यांचे सल्लागार पत्रकार राकेश खराडे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून क्रिकेट खेळाला सुरुवात केली. खालापूर तालुक्याला क्रिकेट खेळाचे माहेर म्हटले जात असल्याने शहरी भागासह ग्रामीण गावात क्रिकेट खेळाचे आकर्षण दिवसेंदिवस अधिकच वाढू लागले आहे. पावसाळा आला की क्रिकेट खेळ थांबला जातो. तो पुन्हा नवरात्रोत्सवानंतर सुरू होतो.

अखेर थांबलेला हा खेळ पुन्हा दसऱ्याच्या मुहूर्तावर सुरू झाला असून काही दिवसांत मर्यादित षटकांच्या क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यास सुरुवात झाल्याचे पहावयास मिळणार आहे.



# शफाली वर्माची अनोख्या विक्रमाला गवसणी

**ढाका : वृत्तसंस्था**

सध्या बांगलादेशमध्ये महिला आशिया चषक स्पर्धेचा थरार सुरू असून भारतीय संघाने यजमान संघाला चितपट करून स्पर्धेत चौथा विजय मिळवला आहे. भारताची सलामीवीर फलंदाज शेफाली वर्मा हिने अष्टपैलू खेळी करून सर्वांची मने जिंकली आणि अनोख्या विक्रमाला गवसणी घातली.

आशिया चषक स्पर्धेत शनिवारी भारत आणि यजमान बांगलादेशचा संघ आमनेसामने होता. प्रथम फलंदाजी करताना भारताने शानदार फलंदाजी करून यजमान संघाच्या गोलंदाजांना घाम फोडला. शेफाली वर्माने पाच चौकार



आणि दोन षटकारांच्या मदतीने शानदार अर्धशतक झळकावले. तिने ४४ चेंडूंत ५५ धावांची खेळी केली. शेफालीने तिच्या अर्धशतकी खेळीदरम्यान टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये तिच्या वैयक्तिक एक हजार धावा पूर्ण केल्या. या फॉरमॅटमध्ये अशी कामगिरी करणारी ती सर्वांत युवा खेळाडू ठरली आहे. शेफालीने वयाच्या १८व्या वर्षी २५३ दिवसांत हा पराक्रम केला आहे. तिने भारताच्याच जेमिमा रॉड्रिग्सला मागे टाकले आहे. रॉड्रिग्सने वयाच्या २१व्या वर्षी १११ दिवसांत एक हजार टी-२० आंतरराष्ट्रीय धावा पूर्ण केल्या होत्या.

लक्षणीय बाब म्हणजे मार्च २०२१नंतर या फॉरमॅटमधले शेफालीचे हे पहिले अर्धशतक आहे. शेफाली आणि कर्णधार स्मृती मानधनाच्या जोडीने बांगलादेशविरुद्धच्या या सामन्यात पहिल्या बळीसाठी १२ षटकांत ९६ धावा जोडल्या. महिला टी-२०मध्ये भारतासाठी १०वेळा पन्नासहून अधिक भागीदारी नोंदवणारी ही पहिली जोडी ठरली आहे.

# रमीज राजाला पाकिस्तानच्याच माजी क्रिकेटपटूने झापले

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

पाकिस्तानच्या संघाला अलिकडेच इंग्लंडविरुद्धच्या सात सामन्यांच्या टी-२० मालिकेत (पाकिस्तान विरुद्ध इंग्लंड) ३-४ असा पराभव पत्करावा लागला आहे. या पराभवानंतर कर्णधार बाबर आझम टीकेचा बळी ठरला. त्याच वेळी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष रमीज राजा यांनी त्याची तुलना विराट कोहलीशी करीत त्याचा बचाव करण्याचा प्रयत्न केला, पण पाकिस्तानचा माजी फलंदाज सलमान बटनेही त्याला चांगलेच सुनावले आहे.

रमीज राजा यांच्या मते, पाकिस्तान संघावर अधिक टीका होत आहे. यासाठी त्यांनी टीम इंडिया आणि विराट कोहलीचे उदाहरण दिले. ते म्हणाले की, आशिया चषक स्पर्धेत भारतीय संघ अंतिम फेरीत पोहचू शकला नाही यासाठी त्याच्यावर खूप टीका व्हायला हवी होती, पण त्याचे चाहते आणि मीडियाने तसे केले नाही. विराट कोहलीने अफगाणिस्तानविरुद्ध शतक झळकावल्यावर त्याचे चाहते संपूर्ण आशिया चषक विसरले. आपण हे कधी करू शकतो का? बाबर आझमने शतक ठोकले असे आपण म्हणतो, पण त्याचा स्ट्राईक रेट फक्त १३५ होता.

रमीज राजांच्या या वक्तव्यावर सलमान बटने टीका केली आहे. त्याच्या यूट्यूब चॅनलवरील संभाषणादरम्यान तो म्हणाला, आपण योग्य उदाहरण देऊ शकत नाही. विराट कोहली हा जगातील अव्वल खेळाडू आहे. त्याच्या नावावर ७०हून अधिक शतके आहेत. माझ्या मते रमीझ राजा खूप निराश आहे. कदाचित काही दिवसांनी इतरांना मिळेल अशी काही बातमी त्यांना मिळाली असेल. तो इतर अनेक गोष्टींबद्दल बोलला ज्यांना मुळीच तर्क नव्हता.

# पंकज अडवाणीने बिलियर्ड्समध्ये जिंकला जागतिक करंडक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा अव्वल स्नूकरपटू पंकज अडवाणीने शनिवारी (दि. ८) मलेशिया येथे पार पडलेल्या जागतिक चॅम्पियनशिपमध्ये बिलियर्ड्सच्या अंतिम फेरीत सौरव कोठारीचा ४-० असा पराभव करून कारकिर्दीतील २५वा जागतिक करंडक जिंकला. १५०पेक्षा जास्त प्रकारामध्ये अडवाणीने १४९च्या ब्रेकसह पहिली फ्रेम घेतली.

सौरवला त्याच्या पहिल्या आयबीएसएफ (आंतरराष्ट्रीय बिलियर्ड्स आणि स्नूकर महासंघ) जागतिक किताबाची प्रतीक्षा आहे. या बेस्ट ऑफ सेव्हन अंतिम सामन्यामध्ये, अडवाणीने सुरुवातीपासूनच आपले सर्वोत्तम प्रदर्शन केले आणि एका कॅलेंडर वर्षात पाचव्यांदा बिलियर्ड्स राष्ट्रीय, आशियाई आणि जागतिक ट्रॉफी जिंकण्याचा अनोखा विक्रम प्रस्थापित केला. कोठारीला दुसऱ्या फ्रेममध्ये काही संधी मिळाल्या, पण त्याचा फायदा त्याला उठवता आला नाही. दुसरीकडे अडवाणीने ७७च्या ब्रेकच्या मदतीने २-० अशी आघाडी घेतली. यानंतर अडवाणींचा खेळ आणखी उत्तम होत गेला आणि त्याने आपल्या कौशल्याने मलेशियाच्या प्रेक्षकांनाही मंत्रमुग्ध केले.

अडवाणीने तिसऱ्या फ्रेममध्ये १५३ धावांचा स्पर्धेतील सर्वोच्च ब्रेक केला, ज्यामुळे तो किताबापासून केवळ एक फ्रेम दूर होता. चौथ्या फ्रेममध्ये ८० आणि ६० असे दोन ब्रेक घेत अडवाणीने ट्रॉफी जिंकली. अडवाणी यांनी याआधी १२ महिन्यांपूर्वी कतारमध्ये शेवटची वर्ल्ड ट्रॉफी जिंकली होती. त्यानंतर त्याने आयबीएसएफ ६-रेड स्नूकर वर्ल्ड कपमध्ये ट्रॉफी जिंकली.

या यशानंतर पंकज अडवाणी म्हणाले की, मी ज्या प्रकारचा खेळ दाखवला आणि यावर्षी प्रत्येक बिलियर्ड्स स्पर्धेत मी ज्याप्रकारे ट्रॉफी जिंकली त्यामुळे मी खूश आहे. जागतिक स्तरावर माझ्या देशासाठी आणखी एक सुवर्णपदक जिंकल्याचा मला अभिमान वाटतो.

# डेव्हिड मिलरच्या मुलीचे निधन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत दौऱ्यावर आलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या संघातील स्टार खेळाडू डेव्हिड मिलर याच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. त्याच्या मुलीचे कॅन्सरमुळे निधन झाले. मिलरने सोशल मीडियावर एक व्हिडीओ पोस्ट करून मुलीच्या आठवणींना उजाळा दिला आहे. रेस्ट ऑफ पीस माझी प्रिन्सेस. माझे खूप खूप प्रेम, असे त्याने पोस्टमध्ये लिहिले आहे.

’स्कट, तूझी खूप आठवण येत राहील. तुझं मन खूपच मोठं होतं. तू आयुष्यात संघर्ष करीत होतीस, परंतु तो संघर्षही सकारात्मकतेने पाहिलास आणि तुझ्या चेहऱ्यावर नेहमी हसू असायचं. तुझ्या या प्रवासात मिळालेल्या प्रत्येक व्यक्तीसाठी तू प्रेरणा होतीस. आयुष्यातील प्रत्येक क्षण कसा जगावा हे तू मला शिकवलेस. आय लव्ह यू,’ असेही मिलरने नमूद केले आहे.















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com